कार्यालयीन उपयोगासाठी

# महाराष्ट्र शासन
# आदिवासी विकास विभाग

# ' सेवापूर्व प्रशिक्षण केन्द्रांचा '
# मुल्यमापन अहवाल.


आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स गार्डन,
पुणे – ४११ ००१.



१९९५

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य परिवहन केंद्रामधील अनुशेष भरुन निघावा, आदिवासी युवकांना या क्षेत्रात योग्य स्थान मिळावे, याकरिता ५ जुलै, १९९० पासून पांढरकवडा येथे वाहनचालक व वाहक प्रशिक्षण विद्यालय सुरु झाले. चांगले व कुशल वाहक तसेच चालक तयार करुन अपघातास आळा घालणे हे या केंद्राचे प्रमुख उदिदष्ट होय.

इ.स.१९८१-८२ ला अकोला येथे पहिले सैन्य भरती व पोलीस प्रशिक्षण केंद्र सुरु झाले. आज अशीआठ प्रशिक्षण केंद्रे आस्तित्वात असून आदिवासी उमेदवारांना सैन्य भरती व पोलीस भरती होण्यासाठी तसेच त्यांची शारिरीक व बौध्दिक तयारी करुन घेण्याच्या दृष्टीने ही प्रशिक्षण केंद्रे उभारण्यातआली आहेत.

शासनाने जरी शासकीय सेवांमध्ये अनुसूचित जमातीसाठी जागा राखून ठेवल्या असल्या तरी योग्य उमेदवार न मिळाल्यामुळे आजपर्यंत बहुतेक जिल्हयांमध्ये पदे रिक्त राहत असल्याचे आढळून येते. परिणामी शासकीय सेवेत अनुसूचित जमातीचा अनुशेष फार मोठा असल्याचे दिसून येते. हा अनुशेष भरुन काढण्यासाठी व अनुशेष राहण्याची कारणे समजून घेण्याकरिता शासनाने १९९४ मध्ये अनुसूचित जमाती कल्याण समिती व यासारख्या अनेक संघटना स्थापन केल्या. या समित्यांना असे आढळून आले की. बऱ्याचदा अनुसूचित जमातीतील व्यक्तींना शासकीय सेवांमध्ये रिक्तपदांची माहिती, विविध शासकीय विभाग व त्यातील रिक्त पदे व त्यासाठी लागणारी गुणवत्ता व शैक्षणिक पात्रता याबाबत माहिती नसते. अथवा या पदांकरिता लागणारी किमान शैक्षणिक पात्रता त्यांच्याकडे नसते. त्यामुळे बहुतेक ठिकाणी जाहिरात देऊनही पात्र आदिवासी उमेदवार उपलब्ध होऊ शकत नाही.

आवश्यक शैक्षणिक पात्रतेचा आदिवासी उमेदवार सापडतो, त्यावेळी सामान्य ज्ञानाचा अभाव यामुळे असे उमेदवार मुलाखतीस पात्र होऊ शकत नाहीत.

वरील अडचणीतून सोडवणूक करण्यासाठी आदिवासी युवकांना विशिष्ट पदांसाठी निवड होण्याकरिता त्यांची शारिरीक, बौध्दिक क्षमता व सामान्य ज्ञान यांचा विकास घडवून आणून त्यांना या सेवांमध्ये सामावून घेणे हे या दोन्ही योजनांचे प्रमुख उदिदष्ट आहे. तथापि, शासनाच्या या योजनेचा मूळ उद्देश येथे अयशस्वी झाल्याचे सैन्य व पोलीस भरती प्रशिक्षण योजनेमध्ये पाहणीतून आढळून येते. उदाहरण द्यायचे झाले तर १९८८-८९ पासून १९९२-९३ या ४ वर्षाच्या कालावधीत २८५८ प्रशिक्षणार्थींनी सैन्य व पोलीस भरती प्रशिक्षण पूर्ण केले . पैकी ७४६ लाभार्थींना (२६ टक्के) नोकरी लागल्याचे निष्पन्न झाले. शासनाच्या या प्रशिक्षणावर होणारा खार्च व त्यातून निष्पन्न होणारे यश अत्यंत तुटपुंजे असल्याचे वरील आकडेवारीवरुन निदर्शनास येते. याउलट स्थिती *पांढरकवडा* व *तळेगांव दाभाडे* येथील वाहनचालक व वाहक प्रशिक्षण केंद्राच्या बाबतीत दिसून आली. नोकरीची हमी मिळत नसल्याने प्रशिक्षणार्थी या प्रशिक्षणास जाण्यास इच्छुक असतात.

सदर मूल्यमापन अहवाल तयार करण्याचे काम या संस्थेतील श्री.दिपक कापसे, संशोधन सहाय्यक यांनी सौ.मंगल घोडे , संशोधन अधिकारी व उपसंचालक,श्री.प्रकाश वाणी यांचे मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. तसेच सदर अहवाल डी.टी.पी.वर टंकलिखित करण्याचे काम श्री.के.पी.कुर्डे, लघुटंकलेखक यांनी केले.

तसेच या योजनांची माहिती पुरविण्यासाठी उपयोजना क्षेत्रातील आठ सैन्य व पोलीस भरती प्रशिक्षण केंद्रे व वाहनचालक व वाहक प्रशिक्षण केंद्रे पांढरकवडा व तळेगांव दाभाडे या कार्यालयांनी चांगले सहकार्य केले.

सदर मूल्यमापन अहवाल सैन्य व पोलीस भरती प्रशिक्षण केंद्राची व्यवस्थित आखणी व अंमलबजावणी करणारे अधिकारी, प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभागातील कर्मचारी, आयुक्त, आदिवासी विकास विभाग व वाहनचालक व वाहक प्रशिक्षण केंद्रातील व्यवस्थापन पांढरकवडा व तळेगांव यांना उपयोगी पडेल अशी आशा आहे.

पुणे

दिनांक २३.६.९५

(डॉ.नवीनचंद्र जैन)
संचालक
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

# अ नु क्र म णि का


| अ.क्र | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | १ |
| १. | मूल्यमापन अहवालाची पार्श्वभूमी | ४ |
| २. | 'सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र' योजना कार्यक्रमांचा आढावा | ६ |
| ३. | मूल्यमापन अहवालाची उदिष्टये आणि संशोधन पध्दती | १२ |
| ४. | सर्व्हेक्षणात गोळा केलेल्या सांख्यिकी माहितीचे पृथ:करण | १५ |
| ५. | निरीक्षणात्मक बाबी | २८ |
| ६. | निष्कर्ष, सूचना तथा शिफारशी | ३१ |
| | प्रपत्र क्र.१ प्रशिक्षण केंद्राची माहिती | ३३ |

# प्रकरण क्र.१

## मूल्यमापन अहवालाची पार्श्वभूमी

१.१ स्वातंत्र्योत्तर काळामध्ये आर्थिक विकासाची क्षेत्रे पादाक्रांत करण्याकरिता भारताने लोकशाही समाजवाद स्विकारला. विकासाच्या वाटचालीत वैयक्तिक हिताला व प्रगतीला वाव देण्याकरिता सर्वांना समान संधी हे धोरण अंगीकारण्यात आले. याचा पुरस्कार करण्यासाठी भारतीय घटनेच्या संविधान अनुच्छेद १६/२ अन्वये कोणाही नागरिकाला जात, धर्म, पंथ, भेद हया कारणास्तव नोकऱ्या नाकारता येणार नाही, तसेच नोकरीमध्ये सर्वांना समान संधी मिळेल, अशी तरतूद करण्यात आली आहे. तथापि, भारतातील काही जाती जमाती वर्षानुवर्षे सामाजिक अन्यायाच्या बळी ठरल्या आहेत. परिणामत: देशाच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रात मागासलेल्या राहिलेल्या आहेत. नागरीकत्वाच्या सर्वसामान्य हक्कांपासूनही त्यांना वंचित ठेवण्यात आले होते. या जाती-जमातींना त्यांचे हक्क देण्याकरिता व राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी भारतीस संविधान कलम ४६ अन्वये त्यांच्यासाठी काही विशेष तरतूद करण्यात आल्या. या जाती-जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नोकरी उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाने राखीव कोटयाचे धोरण जाहीर केले. शासकीय सेवेमध्ये मागासवर्गीय जाती-जमातींकरिता राखीव जागा ठेवण्यात आल्या. त्यांचे प्रमाण पुढीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | १३ टक्के |
| २. | अनुसूचित जमाती | ७ टक्के |
| ३. | विमुक्त जाती ( १४ व तत्सम जाती | ३ टक्के |
| ४. | भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५ टक्के |
| ५. | भटक्या जमाती (धनगर व तत्सम) | ३.५ टक्के |
| ६. | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम) | २ टक्के |
| ७. | इतर मागासवर्गीय | १९ टक्के |

१.२ सन १९९१ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी (७८९.२७) आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ८.०१ टक्के आहे. त्यापैकी ९.२७ टक्के आदिवासी लोकसंख्या महाराष्ट्रात वास्तव्य करीत आहे. महाराष्ट्रात एकूण ४६ अनुसूचित जमाती असल्याचे आढळते. या जमाती विभिन्न ठिकाणी विखुरल्या गेल्या असून काही ठराविक जिल्हयांमध्ये त्यांचे प्रमाण जास्त असल्याचे निदर्शनास येते. ज्या क्षेत्रामध्ये अनुसूचित जमातीचे लोकसंख्येचे प्रमाण ५० टक्के पेक्षा जास्त आढळते. असा भाग 'आदिवासी उपयोजना क्षेत्र' (Tribal Sub Plan Area ) ओळखला जातो. या भागाच्या विकासाची जबाबदारी आदिवासी विकास विभागाकडे जाते. अशा काही जिल्हयांमध्ये अनुसूचित जमातींची लोकसंख्या जास्त असल्यामुळे शासकीय सेवेत त्यांना योग्य प्रतिनिधीत्व मिळणे याकरिता विविध शासकीय सेवांमध्ये अधिक जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. त्यांची जिल्हांवार आकडेवारी पुढीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १. | ठाणे/नाशिक/धुळे | २२ टक्के |
| २. | चंद्रपूर | १५ टक्के |
| ३. | यवतमाळ | १४ टक्के |
| ४. | कुलाबा /रायगड | ९ टक्के |

१.३ शासनाने जरी याप्रमाणे शासकीय सेवांमध्यें अनुसूचित जमातींसाठी जागा राखून ठेवण्यात आल्या असल्या तरी योग्य उमेदवार न मिळाल्यामुळे आजपर्यंत बहुतेक जिल्हयांमध्ये पदे रिक्त राहत असल्याचे आढळून येते. परिणामी शासकीय सेवत अनूसूचित जमातींचा अनुशेष फार मोठा असल्याचे दिसून येते. हा अनुशेष भरुन काढण्यासाठी व अनुशेष राहण्याची कारणे समजून घेण्याकरिता शासनाने १९९४ मध्ये अनुसूचित जमाती कल्याण समिती व यासारंख्या अनेक संघटना स्थापन केल्या. या समित्यांना असे आढळून आले की. बऱ्याचदा अनुसूचित जमातीतील व्यक्तींना शासकीय सेवांमध्ये रिक्त पदांची माहिती मिळत नाही. विविध शासकीय विभाग व त्यातील रिक्त पदे व त्यासाठी लागणारे गुणवत्ता व शैक्षणिक पात्रता याबाबत माहिती नसते. अथवा त्या पदांकरिता लागणारी किमान शैक्षणिक पात्रता त्यांच्याकडे नसते. त्यामुळे बहुतेक ठिकाणी जाहिरात देऊनही पात्र आदिवासी उमेदवार उपलब्ध होऊ शकत नाही.ज्यावेळी आवश्यक शैक्षणिक पात्रतेचा आदिवासी उमेदवार सापडतो, त्यावेळी सामान्य ज्ञानाचा अभाव यामुळे असे उमेदवार आयोगाच्या परीक्षेत मुलाखतीत पास होऊ शकत नाही.त्यामुळे एकूणच आदिवासी उमेदवारांचा अनुशेष वाढत जातो.

## प्रकरण क्र.२

## 'सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र' योजना कार्यक्रमाचा आढावा

शासकीय सेवांमधील अनुशेष भरुन काढण्यासाठी आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी उमेदवारांना सेवापूर्व प्रशिक्षणाच्या योजना राबविण्यास सन १९८१-८२ पासून सुरुवात झाली. केंद्रवर्ती अर्थसंकल्पातून रोजगार निर्मितीसाठी आदिवासींसाठी या योजना राबविण्यास सुरवात झाली. या योजनांमध्येच खालील प्रकारच्या सेवापूर्व प्रशिक्षण देणाऱ्या योजना राबविल्या जाऊ लागल्या.

१ *आदिवासी उमेदवारांना वाहक व वाहनचालक प्रशिक्षण योजना पांढरकवडा :-*

२.१ ५ जुलै, १९९० पासून पांढरकवडा येथे हे चालक प्रशिक्षण विद्यालय सुरु झाले. अशाप्रकारचे चालक प्रशिक्षण विद्यालय सुरु करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे-

१. चांगले व कुशल चालक तसेच वाहक तयार करुन अपघातास आळा घालणे

२. राज्य परिवहन मंडळामधील अनुसूचित जमातीचा मोठया प्रमाणात असलेला अनुशेष भरुन काढणे व आदिवासी उमेदवारांना नोकरीची संधी देणे.

३. चालकांना गाडीची यांत्रिकी माहिती देणे.

४. कर्मचारी वर्ग:- प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यासाठी प्राचार्य व दोन निरीक्षकांची नेमणूक केली आहे. सध्या हे तिन्ही कर्मचारी कार्यरत आहेत.

२.२ चालक प्रशिक्षण विद्यालयासाठी निवडलेले ठिकाण-

१९९० पासून वालक व चालक प्रशिक्षण पांढरकवडा येथे सुरु झाले. पांढरकवड्यापासून दीड कि.मी.अंतरावर हवेशीर व सुसज्ज जागेत हे प्रशिक्षण भरविण्यात येते. यामध्ये एक मोठी क्लासरुम, एक मॉडेल रुम व प्रशिक्षणार्थींना राहण्यासाठी स्वतंत्र खोल्या उपलब्ध आहेत. प्रशिक्षणार्थ्यांसाठी भोजनाची सोय नाही.तथापि, भोजनासाठी रु.३००/- दरमहा प्रति विद्यार्थ्यांस देण्यात येतात.

२.३ चालक प्रशिक्षणार्थी निवडीसंबंधीची प्रक्रिया :- स्थानिक वर्तमानपंत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात येतात. या व्यतिरिक्त महाराष्ट्रातील विविध प्रकल्प कार्यालयाकडून पाठविण्यात आलेल्या यादीनुसार उमेदवार निवडीला हजर झाल्यानंतर त्यांना वैद्यकिय अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, यवतमाळ यांच्याकडे वैद्यकिय चाचणीसाठी नेण्यात येते. वैद्यकिय चाचणीमध्ये जे उमेदवार उत्तीर्ण होतील अशानांच फक्त प्रशिक्षणासाठी दाखल करुन घेण्यात येते.

२.४ **प्रशिक्षण कालावधी :-** चालक प्रशिक्षण विद्यालय, पांढरकवडा, येथील चालक प्रशिक्षणार्थी उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी एकूण ३ महिन्याचा असतो. सदर कालावधीमध्ये प्रशिक्षणार्थींना प्रतिमाह रु.३००/- + १५० += ४५० विद्यावेतन देण्यात येते.

२.५ **प्रत्येक सत्रासाठी एकूण चालक प्रशिक्षणार्थींची संख्या :-** प्रत्येक सत्रासाठी सुमारे ५० प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्याची क्षमता आहे. तथापि, ३० ते ३५ प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात येतो.

२.६ **अभ्यासक्रम:-** चालक प्रशिक्षण विद्यालय, पांढरकवडा साठी प्रशिक्षणार्थींना नेमून दिलेला जो अभ्यासक्रम आहे. त्यानुसारच सदरच्या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित करण्यात येते. त्यामध्ये प्रामुख्याने

१. वाहनचालन सराव

२. यांत्रिकी विषय

३. बिगर यांत्रिकी

इत्यादी विषय समाविष्ट आहेत.

वाहनचालन सरावामध्ये प्रामुख्याने खालील बाबतीत कटाक्षाने भर दिला जातो. जाहिरात देऊन मागविण्यात आलेल्या अर्जांची छाननी करुन त्यामध्ये जे उमेदवार पात्र ठरतील अशानांच फक्त मुलाखतीसाठी बोलविण्यात येते. यातून प्रशिक्षणार्थींची निवड केली जाते.

२.७ **चालक प्रशिक्षणार्थींची निवड खालील निकषांवर केली जाते.**

१. वय किमान २३ वर्षे पूर्ण व कमाल ३५ वर्षे (माजी सैनिकांसाठी ४५ वर्षे)

२. शिक्षण किमान ७ वी पास

३. उंची किमान १६३ से.मी.कमाल १८० से.मी.

४. अवजड मोटार वाहन परवानाधारक (प्रवासी सेवा बिल्ला असल्यास प्राधान्य)

५. दृष्टीक्षमता पुरेशी (चष्म्याविना ६/६)

६. चालक म्हणून काम करण्यात वैद्यकिय/शारिरीकदृष्टया समर्थ असावा.

७. सुधारीत नमुन्यातील अनुसूचित जमातीचा दाखला ( १९८५ नंतरचा)

८. माजी सैनिक असल्यास सैन्यातून निवृत्त झाल्याचा दाखला

९. दोन प्रतिष्ठीत व्यक्तींचे वर्तणूकीचे दाखले

१०. ३ वर्षाचा अनुभव असल्यास जास्त पसंती

निवडलेल्या प्रशिक्षणार्थींच्या मुलाखाती घेतल्या जातात. मुलाखतीमध्ये उंची, वजन, छाती इ.चे मोजमाप तदनंतर शारिरीकदृष्अया समर्थ आहे किंवा कसे यासाठी कवायत (उंचउडी, पळणे इ.)· नंतर पात्र उमेदवारांची ड्रायव्हींग टेस्ट, शैक्षणिक दाखले व इतर कागदपत्रांची छाननी व सर्वात शेवटी वैयक्तिक मुलाखती (Personal Intervew) .

या सर्वामध्ये जे उमेदवार उत्तीर्ण होतील अशांची गुणवत्ता यादी (मेरिट लिस्ट) बनविण्यात येते. तदनंतर आवश्यकतेनुसार त्यांना प्रशिक्षणासाठी बोलविण्यात येते..

| अ.क | वर्गवारी | अंतर कि.मी. |
|---|---|---|
| १. | घाट ड्रायव्हींग | १०० |
| २. | रात्रीचे ड्रायव्हींग | ७५ |
| ३. | पावसाळयातील ड्रायव्हींग | ७५ |
| ४. | शहर अथवा गर्दीच्या ठिकाणी वाहन चालविणे | |
| ५. | सपाट (प्लेन) ड्रायव्हींग (मोकळया रस्त्यावरील) | २५० |
| एकूण | | ५०० |

प्रत्येक प्रशिक्षणार्थींना उपरोक्त वर्गवारीनुसार सुमारे ५०० कि.मी.वाहनचालन सराव दिला जातो. आवश्यकतेनुसार यामध्ये काहीवेळा वाढ केली जाते.

२.८ चालक अंतिम चाचणी :-

चालक प्रशिक्षणार्थींच्या एकूण ३ महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांचा प्रगती अहवाल चाचणीव्दारे पाहिला जातो. तसेच ३ महिन्याच्या प्रशिक्षणानंतर यंत्र अभियंता (प्रशिक्षण) यांचेमार्फत प्रशिक्षणार्थींची अंतिम चाचणी घेतली ताते. तत्पूर्वी ज्या प्रशिक्षणार्थींकडे प्रवासी वाहन चालविण्याचा बिल्ला नसेल, त्यासाठी त्यांची चाचणी संबंधित आर.टी.ओ.मार्फत घेण्यात येऊन त्यामध्ये त्यास उत्तीर्ण व्हावे लागते.

अंतिम चाचणीमध्ये उत्तीर्ण झाल्यानंतर सदर चालकांच्या नेमणूकीचे आदेश काढले जातात.

२.९ वरीलप्रमाणेच आणखी एक चालक प्रशिक्षण विद्यालय, तळेगांव दाभाडे, येथे असून २२.१.७९ पासून सुरु झाले आहे. येथे पायलेट प्रोजेक्ट ट्रेनिंग स्कीम राबविली जाते. या प्रशिक्षण विद्यालयात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त व भटक्या जाती जमातीच्या प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेश दिला जातो.

## २. *आदिवासी उमेदवारांना सैन्य भरती व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण*

आदिवासी उमेदवारांना सैन्य भरती व पोलीस दलात भरती होण्यासाठी तसेच त्यांची शारिरीक व बौध्दिक तयारी करुन घेण्याच्या उद्देशाने ही प्रशिक्षण केंद्रे उभारण्यात आली. चालक प्रशिक्षण विद्यालय सुरु करण्याचे मुख्य उद्देश म्हणजे

१. सैन्य व पोलीस दलासाठी चांगले व कुशल जवान तयार करणे

२. सैन्य दलातील व पोलीस दलातील अनुसूचित जमातींचा अनुशेष भरुन काढणे

३. प्रशिक्षणार्थ्यांकडून शारिरीक व बौध्दिक परीक्षांची तयारी करुन घेणे

२.१० प्रशिक्षण केंद्रांची ठिकाणे :-

सन १९८१-८२ मध्ये अकोले येथे पहिले पोलीस / सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले.

त्याच धर्तीवर १९८८-८९ मध्ये तळोदा येथे दुसरे पोलीस/सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले. तळोदा येथे ४ महिन्यांचे एक याप्रमाणे दोन प्रशिक्षण सत्रे संबंधित वर्षात राबविण्यात आली व एकूण १०५ उमेदवारांना प्रशिक्षण दिले गेले. नैकी ६० उमेदवारांना त्वरीत नोकरी प्राप्त झाली. हे दिसून आल्यामुळे शासनाने त्याच धर्तीवर सन १९८८-८९ मध्ये आणखी आठ (८) प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली. सदरची प्रशिक्षण केंद्रे खालील ठिकाणी स्थापन करण्यात आली.

१. नाशिक

२. जव्हार

३. घोडेगांव

४. नंदूरबार

५.धारणी

६.देसाईगंज

७.किनवट

८.चंद्रपूर

प्रशासकीय नियंत्रण (ॲडमिनिस्ट्रटीव्ह कंट्रोल)

आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांचे नियंत्रणाखाली संबंधित प्रशिक्षण केंद्राचे प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अखत्यारीत प्रशिक्षण केद्राचे नियंत्रण होते.

२.११ एकूण मंजूर कर्मचारी वर्ग :-

शासन निर्णयाप्रमाणे केंद्र प्रमुख हा सैन्यातील सुभेदार पद धारण केलेला सेवानिवृत्त अधिकारी असतो. केंद्र प्रमुखास मदतनीस म्हणून सेवानिवृत्त पोलीस हवालदार असतो. या व्यतिरिक्त कर्मचारी किती असावेत याची निश्चिती दिसून येत नाही. काही ठिकाणी पाच कर्मचारी दिसून येतात. काही ठिकाणी तीन कर्मचारी काम करतात.

या व्यतिरिक्त बौध्दिक परीक्षेची तयारी करुन घेण्याच्या दृष्टीने इंग्रजी , गणित व सामान्य विज्ञान हे विषय शिकविण्यासाठी बाहेरील तज्ञ शिक्षकांचेही आयोजन केले जाते.

२.१२ निवडीसंबंधी प्रक्रिया :-

वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देण्यात येवून उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येतात. तदनंतर अर्जाची छाननी करुन त्यामध्ये जे उमेदवार पात्र ठरतील अशांनाच फक्त मुलाखतीसाठी बोलाविण्यात येते.

सैन्य व पोलीस दलातील भरती प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थींची निवड खालील निकषावर केली जाते.

१. शिक्षण :- इयत्ता ९ वी पास असावा (शाळा सोडल्याचा दाखला)

२. उंची:- किमान १६५ से.मी.

३. वजन:- ५० कि.

४. छाती:- ७९ से.मी. फुगवून ८४ से.मी.

५. अनुसूचित जमातीचा दाखला

**२.१३ बौध्दिक निकष :- बौध्दिक** निकषात उमेदवारास सोप्या पध्दतीचे अंकगणित येणे आवश्यक व मातृभाषेचे सर्वसामान्य ज्ञान माहिती असणे आवश्यक

किनवट, नंदूरबार,अकोला, नाशिक येथे लेखी बौध्दीक परीक्षा घेउन प्रवेश देण्यात येतो. तर उर्वरित ठिकाणी तोंडी परीक्षा घेऊन प्रवेश दिला जातो.

मुलाखतीमध्ये प्रथम उंची, वजन,छाती, इत्यांदीचे मोजमाप , तदनंतर शारिरीकदृष्टया समर्थ आहे किवा कसे यासाठी कवायत (उंच उडी, पळणे इ.) नंतर पात्र उमेदवारांची शैक्षणिक दाखले व इतर कागदपत्रांची छाननी व सर्वात शेवटी वैयक्तिक मुलाखती (Personal Interview )

या सर्वांमध्ये जे उमेदवार उत्तीर्ण होतील, अशांची गुणवत्ता यादी बनविण्यात येते व तदनंतर आवश्यकतेनुसार त्यांना प्रशिक्षणासाठी बोलविण्यात येते. वैद्यकिय अधिकारी ग्रामीण रुग्णालयात तपासणीसाठी पाठविण्यात येते. तेथे उत्तीर्ण झालेल्यांना प्रशिक्षण केंद्रात दाखल करुन घेतले जाते.

**२.१४ प्रशिक्षण कालावधी :-**

सैन्य व पोलीस भरती प्रशिक्षणाचा कालावधी एकूण ४ महिन्यांचा आहे.

प्रशिक्षण कालावधीत छात्रांना भोजन, निवास, परतीचा प्रवास खर्च, वैद्यकिय खर्च इत्यादी सुविधा मोफत पुरविण्यात येतात. विद्यावेतन दिले जात नाही.

**२.१५ अभ्यासक्रम :-**

१. शारिरीक :-

अ. ५ कि.मी.दररोज धावणे

ब. शारिरीक व्यायाम पाऊण तास

क. प्लप्स

ड. डबलबार

इ. सिंगलबार

फ	दोरीच्या उडया

ग.	दोरीवर उंच चढणे

ह.	गोळाफेक

इ.	लांब उडी

ज.	भालाफेक

क.	कदमताल

२.	**बौध्दीक प्रशिक्षण :-**

बौध्दिक प्रशिक्षणात उमेदवारास सामान्यज्ञान, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, मराठीत सोपी वाक्यरचना करणे व आदिवासी प्रशिक्षणार्थींना बाहेरच्या जगाचे ज्ञान करुन देणे इ. प्रशिक्षण दररोज देण्यात येते.

शारिरीक प्रशिक्षणावर जास्त भर देण्यात येतो. प्रशिक्षणार्थीच्या एकूण ४ महिन्याच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये अंतिम चाचणी घेतली जाते, अशा चाचणीमध्ये उत्तीर्ण झाल्यावर त्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात येऊन प्रशिक्षणाची समाप्ती होते.

२.१६	प्रशिक्षण कालावधीत देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा :-

आदिवासी युवकांना प्रशिक्षणासाठी दोन प्रकारच्या वस्तु स्वरुपातील सुविधा पुरविण्यात येतात. मोफत जेवण, कपडे, राहण्याची सोय, एस.एस.सी.मध्ये नापास विद्यार्थ्यांना गेलेल्या विषयांना परीक्षेस बसण्याची संधी दिली जाते.

१.	कायम स्वरुपी दिल्या जाणाऱ्या वस्तु

राज्यातील सर्व प्रशिक्षण केंद्रातून खालील प्रकारच्या वस्तु कायमस्वरुपी शासनामार्फत पुरविण्यात येतात.

अ.	अैकंल बूट, सॉक्स

ब.	पी.टी.शूज सॉक्स

क.	बनियन

ड.	टी शर्ट बनियन

इ.	शर्ट टेरिकॉट

फ	खाकी हाफ पँट टेरिकॉट

२.	तात्पुरत्या स्वरुपात दिल्या जाणाऱ्या वस्तु

अ.	बेल्ट, टोपी

ब.	स्टील प्लेट, २ वाटया, ग्लास, तांब्या

क.	ब्लँकेट,चादर, उशी, गादी,उशी कव्हर

या व्यतिरिक्त प्रशिक्षणार्थींची तब्येत सुदृढ होण्यासाठी विशेष आहार दररोज दूध व आठवडयातून एकदा मांसाहार देण्यात येतो.

# प्रकरण ३ रे

## मूल्यमापन अहवालाची उद्दिष्टये आणि संशोधन पध्दती

सन १९८१-८२ मध्ये आदिवासी उमेदवारांना पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यासाठीचे पहिले केंद्र अकोला येथे प्रथम उभारण्यात आले.

३.१ हयाच धर्तीवर प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, तळोदा यांनी सन १९८८-८९ यावर्षी तळोदा येथे सेवापूर्व प्रशिक्षण केद्र सुरु केले. सदरच्या केंद्रात चार महिन्यांचे एक या प्रमाणे दोन सत्रात आदिवासी उमेदवारांना निरनिराळया प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले. दोन सत्रातील एकूण १०५ उमेदवारापैंकी ६० उमेदवारांना नोकरीची संधी प्राप्त झाली. वरील अकोला व तळोदा येथील सेवापूर्व केंद्रातील जास्तीत जास्त उमेदवारांना नोकरीची संधी प्राप्त झाली हे दिसून आल्यामुळे शासनाने त्याच धर्तीवर सन १९८९ मध्ये आणखी आठ पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली. सदरची केंद्रे खालील ठिकाणी स्थापन केली.

१. नाशिक
२. जव्हार
३. घोडेगांव
४. नंदूरबार
५. धारणी
६. देसाईगंज
७. किनवट
८. चंद्रपूर

वरील प्रशिक्षण केंद्रे स्थापन झाल्यापासून किती उमेदवारांना नोकरी लागली व त्यापासून किती उमेदवारांना प्रशिक्षणदिले गेले, या केंद्राच्या अडचणी तसेच नव्याने निर्माण झालेले प्रशिक्षण केंद्रात एकसूत्रता आहे का ? पूर्वीच्या प्रशिक्षण केंद्रात व नवीन प्रशिक्षण केंद्रातील कामकाजात काय फरक आहे व यासाठी काय बदल करणे आवश्यक आहे, यांचे मूल्यमापन व अभ्यास करण्यासाठी सदरच्या अहवालाचे मूल्यमापनाचे काम खालील उदिष्टये नजरेसमोर ठेऊन हाती घेण्यात आले आहे.

### ३.२ मूल्यमापन अहवालांची ठळक उदिष्टये :-

सेवापूर्व प्रशिक्षणाचा मूल्यमापन अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व १० सेवापूर्व प्रशिक्षण संस्थांचा मूल्यमापनासाठी समावेश करण्यात येत आहे. हा अहवाल तयार करण्यासाठी खालील उदिष्टये निश्चित करण्यात येत आहेत.

१. सेवापूर्व प्रशिक्षण केंद्राच्या उद्देशांचा अभ्यास करणे

२. सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रामार्फत घेतल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा अभ्यास करणे

३. सेवापूर्व प्रशिक्षणार्थींना व्याख्यान देण्यासाठी येणारे वक्ते, शिक्षक यांचा अभ्यास करणे

४. प्रशिक्षण संस्थांच्या समस्यांचा अभ्यास करणे

५. सेवापूर्व प्रशिक्षण वर्गांना अनुसूचित जमातीतील विद्यार्थी

६. सेवापूर्व प्रशिक्षण संस्थांना प्रशिक्षण सत्रे राबविण्यात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

७. सेवापूर्व प्रशिक्षण संस्थांची उपयुक्तता कितपत आहे, हे अजमावणे

८. सेवापूर्व प्रशिक्षण संस्थांची उपयुक्तता अधिक वाढविण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविणे

३.३ मूल्यमापन अहवालाची संशोधन पध्दती :-

सेवापूर्व प्रशिक्षण केंद्राच्या मूल्यमापन अहवालाकरिता व्यष्टी अध्ययन पध्दती (Case Study Method ) वापरण्याचे निश्चित करण्यात आले.

अभ्यासाचा विषय विशिष्ट संस्था, केंद्र अशा स्वरुपाचा एखादा घटक (Unit) असेल तर त्या घटकाचे सुक्षम व सखोल अध्ययन करण्यासाठी व्यष्टी अध्ययन पध्दतीची निवड करणे योग्य ठरते. या पध्दतीमुळे त्या विशिष्ट घटकाचे विविध पैलू, त्यांच्या त्रुटी बारकाव्यासंहित लक्षात घेतात . या घटकांचा अभ्यास करण्याकरिता प्रत्यक्ष निरीक्षण, प्रश्नावली, अनुसूची, वैयक्तिक मुलाखती आदि तंत्र पध्दतीचा वापर करण्यासही वाव मिळतो. या पध्दतीमध्ये ज्याचा अभ्यास करावयाचाआहे, त्या घटकांशी संबंधित असलेली कागदपत्रे वापरण्यास मुक्त परवानगी मिळते. या सर्व बाबी लक्षात घेऊन व्यष्टी अध्ययन पध्दतीची निवड संशोधन पध्दतीत करणे,केवळ योग्य नव्हे तर अपरिहार्य ठरते.

३.४ या मूल्यमापन अहवालाचे काम करताना सेवापूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याऱ्या एकूण दहा संस्था असल्याचे आढळले. या दहा संस्थांमध्यें नमुना निवड करण्यापेक्षा दहाही संस्थांना भेटी देऊन त्यांच्याकडून आवश्यक ती सर्व माहिती भरुन घेऊन प्रशिक्षणार्थी, प्रशिक्षक, केंद्र व्यवस्थापक, प्रकल्प अधिकारी, यांची याबाबतची मते अनौपचारिक व औपचारिक मते मुलाखातीव्दारे जाणून घेऊन प्रत्यक्ष निरीक्षण करुनच या संस्थांचे मूल्यमापन करणे उचित ठरेल, असे वाटल्यामुळे सर्व (१०) संस्थांची क्षेत्रीय पाहणी करण्यात आली.तसेच अहवालाकरिता व्यष्टी अध्ययन पध्दतीला अन्य पर्याय शोधण्याची गरज राहिली नाही. कारण या सर्व पध्दतींचा वापर आपण व्यष्टी अध्ययनात करु शकतो.

३.५ उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे या दहा संस्था व्यतिरिक्त आदिवासी उमेदवारांसाठी मौलिक कार्य करणाऱ्या खालील दोन संस्थांना या संस्थेतील अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या.

१. वाहनचालक व वाहक प्रशिक्षण संस्था, ता.पांढरकवडा, जिल्हा-यवतमाळ

२. वाहनचालक व वाहक प्रशिक्षण संस्था, तळेगांव, ता.मावळ, जि.पुणे

वरील दोन्ही संस्था गाड्या चालविण्याचे शास्त्रोशुध्द तंत्रज्ञान आदिवासी उमेदवारांना शिकवितात. या दोन्ही संस्थांचा तुलनात्मक अभ्यास केला तर बरीच सांख्यिकी माहिती व तथ्थे हाती येऊ शकेल, असे वाटल्याने, क्षेत्रीय पाहणीत

या संस्थांचाही समावेश करण्यात आला. या आधारे गोळा केलेली माहिती व तथ्थे संकलित करुन त्या आधारे हा मूल्यमापन अहवाल तयार करण्यात आलेला आहे.

प्रशिक्षण केंद्राची स्थापना झाल्यापासून ते ऑगस्ट, १९९३ पर्यंतचा कालावधी मूल्यमापन अहवालात अभ्यासण्यात आला आहे.

### ३.६ क्षेत्रीय पाहणीत भरावयाची पत्रके-

सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण तसेच वाहनचालक प्रशिक्षण अंतर्गत प्रशिक्षणाचा लाभ घेतलेल्या, केंद्र चालविण्याऱ्या संचालक तथा व्यवस्थापकांकडून प्रपत्रे भरुन घेण्यात आली. त्यामध्ये प्रशिक्षण योजनेसंबंधीचे अभिप्राय तसेच योजनेच्या अंमलबजावणीमधील त्रुटी /अडथळे इत्यादीबाबतची माहिती घेण्यात आली.

# प्रकरण क.४

## सर्व्हेक्षणात गोळा केलेल्या सांख्यिकी माहितीचे पृथ:करण

४.१ केंद्र व राज्य शासनाने अनुसूचित जाती-जमातीतील नागरिकांना विकासात सहभागी करुन घेण्याकरिता त्यांना वैयक्तिक विकासाची संधी देण्याकरिता शासनाच्या विविध विभागामध्ये राखीव जागा घोषित केल्या आहेत. पण अनुसूचित जाती-जमातींकरिता राखीव जागा ठेवूनही योग्य उमेदवाराच्या अभावी या जागा भरल्या जात नाहीत, राखीव जागांचा अनुशेष फार मोठा आहे, असे विविध सर्व्हेक्षणामध्ये आढळून आले आहे. या संदर्भातील विवेचन आपण प्रथम प्रकरणात पाहिले आहे. हा अनुसूचित जमातीचा अनुशेष भरुन काढण्याकरिता आदिवासी विकास विभागाने सेवापूर्व प्रशिक्षण केंद्राची योजना आखली. सैन्य व पोलीस दलातील पदांकरिता भरतीपूर्व प्रशिक्षण देण्याकरिता नाशिक, धुळे, चंद्रपूर, अमरावती, नांदेड, ठाणे, पुणे,गडचिरोली आणि तळोदा या ठिकाणी एकून नऊ केंद्रे स्थापन करण्यात आली तर यवतमाळ जिल्हयामध्ये वाहन-चालक प्रशिक्षण विद्यालय सुरु करण्यात आले. या प्रशिक्षण केंद्रांना भेट दिली असता केंद्राच्या स्थापनेपासून ते आजतागायत केंद्राची कार्यपध्दती, प्रशिक्षणार्थींची संख्या , प्रशिक्षण पूर्ण करुन नोकरीस लागलेल्या व न लागलेल्या युवकांची संख्या याबाबत सविस्तर माहिती गोळा करण्यात आली. या सांख्यिकी माहितीच्या आधारे तक्तीकरण व विश्लेषणाच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रमाचा जो आढावा घेण्यात आला आहे, त्याचे विवेचन पुढील तक्त्यांमधून सादर करण्यात येत आहे.

तक्ता क्र.४.१

सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रामधील पदांची क्षमता व एकूण प्रवेश दिलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या निर्देशित करणारा तक्ता

| अ. क. | केंद्राचे नाव | एकूण सत्रे | प्रशिक्षणासाठी जागाची क्षमता | | | | प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्यांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ |
| १. | नाशिक, जि,नाशिक | १० | ५० | ५० | १०० | १०० | ४५ | ३८ | ५६ | ४० |
| | | - | - | ५० | १०० | १०० | - | ३१ | ५८ | ४५ |
| | | - | - | ५० | १०० | १०० | - | ४९ | ४६ | ४३ |
| २. | नंदूररबार, जि.धुळे | ९ | १०० | १०० | १०० | १०० | ५८ | ५७ | १८ | २१ |
| | | | - | १०० | १०० | १०० | - | ४० | ४५ | ३५ |
| | | | - | - | १०० | १०० | - | - | ४६ | ३३ |
| ३. | चंद्रपूर, जि.चंद्रपूर | ६ | १०० | १०० | १०० | १०० | ६९ | ६९ | ५८ | ६७ |
| | | | - | - | १०० | - | - | - | ७० | - |
| | | | - | - | १०० | - | - | - | ६० | - |
| ४. | धारणी, जि.अमरावती | ६ | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | ५० |
| | | | - | - | १०० | १०० | - | - | १०० | ५० |
| ५. | किनवट, जि.नांदेड | ५ | ७० | ७० | ७० | १०० | ४६ | ३६ | ५६ | ७४ |
| | | | - | - | - | ७० | - | - | - | ३५ |
| ६. | जव्हार, जि.ठाणे | १० | - | १०० | १०० | १०० | - | ३३ | २८ | ५२ |
| | | | - | १०० | १०० | १०० | - | ५७ | २८ | ६५ |
| | | | - | १०० | १०० | - | - | २२ | २९ | - |
| | | | - | १०० | १०० | - | - | ३७ | ५२ | - |

| अ. क. | केंद्राचे नाव | एकूण सत्रे | प्रशिक्षणासाठी जागांची क्षमता | | | | प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्यांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | घोडेगाव, जि.पुणे | ८ | -<br>-<br>- | ५०<br>५०<br>५० | ५०<br>५०<br>५० | २१<br>५०<br>- | -<br>-<br>- | ५०<br>४७<br>४४ | ५३<br>५१<br>६४ | २१<br>६१<br>- |
| ८. | वडसा, जि.गडचिरोली | ७ | १००<br>- | १००<br>१०० | १००<br>१०० | १००<br>१०० | ६२<br>- | ३४<br>३४ | ४०<br>४५ | १९<br>३९ |
| ९. | तळोदा, जि.धुळे | २ | ६० | ६० | - | - | ६९ | ४५ | - | - |
| | एकूण पदे | ६३ | ५८० | १४३० | १९२० | १५४१ | ४४९ | ८२३ | ११०६ | ७५० |
| रिक्त पदे | | | | | | | १३१ | ६०७ | ८१४ | ७९१ |
| प्रवेशार्थीची टक्केवारी | | | | | | | ७७% | ५७% | ५७% | ४८% |
| रिक्त पदांची टक्केवारी | | | | | | | २२ % | ४२% | ४२% | ५१ % |

४.२ तक्ता क्रमांक ४.१ ची पाहणी केली असता सैन्य व पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण देणारया नऊ केंद्राची एकूण सत्रानुसार पदांची क्षमता लक्षात येते. संपूर्ण तक्त्यांचे टक्केवारीचे अवलोकन केले असता १९८९-९० ते १९९२-९३ या कालावधीत या नऊ केंद्रामध्ये एकूण त्रेसष्ट प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात आली होती,असे लक्षात येते. या प्रशिक्षणाचा कालावधी साधारणत: चार महिन्यांचा आहे. प्रशिक्षणासाठी रिक्त जागांची क्षमता आणि प्रत्यक्षात प्रवेश दिलेले प्रशिक्षणार्थी यांच्या सांख्यिकी आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास केला असता १९८९-९० मध्ये ७७ टक्के युवकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. १९९०-९१ व १९९१-९२ मध्ये हे प्रमाण ५७ टक्के होते तर, १९९२-९३ मध्ये हे प्रमाण ४८ टक्केवर आले असल्याचे आढळते. १९८९-९० ते १९९२-९३ या कालावधीत या प्रशिक्षण सत्रामध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींची आकडेवारी दिवसेदिवस रोडावत जात असल्याचे आढळून येते. हे प्रशिक्षण पूर्ण केलयानंतर सैन्य व पोलीस दलात नोकरी मिळण्याची शक्यता असतानाही याकडे वळणाऱ्या प्रशिक्षणार्थींची संख्या कमी होत जाते याचे कारणे १. प्रशिक्षणाबाबतची माहिती नसणे. २. प्रशिक्षणाच्या जाहिरातील आदिवासी युवकांपर्यंत न पोहोचणे, ३. प्रकल्प अधिकारी स्तरावर त्रुटी असणे ४. आदिवासी युवकांचा ओढा सैन्य व पोलीस दलातील नोकरी ऐवजी नागरी सेवांमध्ये असणे ५. वैद्यकिय तपासणीत युवकांच्या शारिरीक व बौध्दीक क्षमतामध्येही कमतरता आढळणे. यापैकी काहीही असू शकते, ही शक्यता लक्षात घेऊन या युवकांच्या शारिरीक व बौध्दीक क्षमतांची पाहणीही या अहवालात करण्यात आली

तक्ता क.४.२

**सेवापूर्व प्रशिक्षण संस्थांतील प्रशिक्षणार्थींच्या शारिरीक व बौध्दीक क्षमता निर्देशित करणारा तक्ता**

| अ.क. | केंद्राचे नाव | शारिरीक क्षमतेत प्रशिक्षणार्थी कमी पडतात का ? | | बौध्दीक क्षमतेत प्रशिक्षणार्थी कमी पडतात का ? | | कोणते प्रशिक्षण दिले जाते ? | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | होय | नाही | शारिरीक | बौध्दीक |
| १. | नाशिक, जि.नाशिक | होय | नाही | होय | नाही | होय | होय |
| २. | नदूरबार, जि.धुळे | होय | नाही | होय | नाही | होय | होय |
| ३. | चद्रपूर, जि.चद्रपूर | होय | नाही | होय | नाही | होय | होय |
| ४. | धारणी, जि.अमरावती | नाही | होय | होय | नाही | होय | होय |
| ५. | किनवट, जि.नादेड | होय | नाही | होय | नाही | होय | होय |

| अ.क. | केंद्राचे नाव | शारिरीक क्षमतेत प्रशिक्षणार्थी कमी पडतात का ? | | बौध्दीक क्षमतेत प्रशिक्षणार्थी कमी पडतात का ? | | कोणते प्रशिक्षण दिले जाते ? | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | होय | नाही | शारिरीक | बौध्दीक |
| ६. | जव्हार, जि.ठाणे | होय | नाही | होय | नाही | होय | होय |
| ७. | घोडेगाव, जि.पुणे | होय | नाही | होय | नाही | होय | होय |
| ८. | वडसा, जि.गडचिरोली | होय | नाही | होय | नाही | नाही | होय |
| ९. | तळोदा, जि.धुळे | होय | नाही | होय | नाही | होय | होय |
| १०. | पाढरकवडा, जि.यवतमाळ | नाही | होय | नाही | होय | नाही | नाही |
| ११. | तळेगाव दाभाडे, जि.पुणे | होय | नाही | होय | नाही | होय | होय |
| एकूण | | ९ | २ | १० | १ | ९ | १० |

४.३ उपरोक्त तक्ता आदिवासी युवक प्रशिक्षणार्थींच्या शारिरीक व बौध्दीक क्षमता निर्देशित करणारा, तसेच या त्रुटीनुसार उपरोक्त केंद्रामध्ये प्रशिक्षण देण्यात येते अथवा कसे ? याची पाहणी करणारा आहे. शारिरीक क्षमतांची पडताळणी करतांना सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण देणाऱ्या नऊ प्रशिक्षण केंद्राव्यतिरिक्त वाहनचालकाचे प्रशिक्षण देणाऱ्या यवतमाळ व पुणे जिल्हयातील दोन संस्थांचा समावेशही वरील तक्त्यामध्ये करण्यात आला आहे.यातील यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा येथील वाहनचालक प्रशिक्षण विद्यालय हे केंद्र आदिवासी विकास विभागामार्फत सुरु करण्यात आले आहे असून त्यला राज्य परिवहन मंडळाचा निधीही उपलब्ध झालेला आहे.पुणे जिल्हयातील तळेगांव दाभाडे येथील वाहनचालक प्रशिक्षण संस्था ही राज्य परिवहन महामंडळाची प्रशिक्षण संस्था असून या संस्थेतर्फे आदिवासी व मागासवर्गीय जाती-जमातींच्या प्रशिक्षणार्थींना वाहनचालकांचे प्रशिक्षण देण्यात येते. अशा एकूणा अकरा संस्थांची पाहणी केली असता त्यापैकी नऊ संस्थांनी त्यांच्याकडे येणारे प्रशिक्षणार्थी शारिरीक क्षमतांमध्ये कमी पडताह असे मत नमूद केले आहे. १. त्वचा रोग २. गुडगे घालणे-पायांचे तळवे सपाट असणे ३. वजन कमी असणे ४. छातीमध्ये कमी पडणे ५. ॲनिमिक असणे ६. उंची कमीअसणे ७. मैदानी स्पर्धेत मागे असणे यासारखे शारिरीक दोष या युवकांमध्ये असल्याचे वैद्यकिय पाहणीतून सिध्द झाले आहे. चौरस आहाराचा अभाव, कुपोषण, वांशिक आजार यासारख्या कारणामुळे उपरोक्त शारिरीक दोष उद्‌भवतात. या समस्येमुळे प्रशिक्षण केंद्रात प्रवेश न मिळणाऱ्या युवकांची संख्याही लक्षणीय आहे. यातील वजन,दमछाक यासारखे दोष दूर करण्याकरिता प्रशिक्षण केंद्रामध्ये शारिरीक कसरतीचे प्रशिक्षण देण्यात येते व विशेष लक्षपूर्वक चौरस आहार देण्याचा प्रयत्न केला जातो, असे क्षेत्रीय पाहणीचे वेळी निदर्शनास आले आहे.

४.४ आदिवासी युवकांच्या बौध्दीक क्षमतांची चाचणी घेतली असता १. सामान्य ज्ञान २. इंग्रजी ३. गणित ४. भाषा-मराठी या विषयामध्ये हे युवक मागे राहत असल्याची नोंद अकरापैकी दहा प्रशिक्षण केंद्राच्या शिबिर प्रमुखांनी केली आहे. ज्या एक प्रशिक्षण केंद्राच्या प्रमुखांनी याबाबत तक्रार नोंदली नाही ते पांढरकवडा, जि.यवतमाळ येथील वाहनचालक प्रशिक्षण विद्यालय असून वाहनचालकांसाठी विशेष बौध्दिक पात्रताविषयक तपासणी केली जात नसल्यामुळेच त्यांनी याविषयी आपले मत इथे नमूद केले नसावे. बहुतांशी आदिवासी पाडे हे गांवापासून दूर दुर्गम भागात असतात. दळणवळणाच्या साधनांच्या आणि प्रसिध्दी व जनसंपर्क माध्यमांच्या अभावामुळे अशा ठिकाणी राहणाऱ्या युवकांचे सामान्य ज्ञान जवळ जवळ अपूर्ण असण्यामध्ये जमा होते. शाळा शिकत असताना दडपणामुळे सदोष शिक्षण प्रणालीमुळे गणित, भाषा या विषयांबाबत मनात

जी भिती बसलेली असते ती नंतर कधीच दूर होऊ शकल्यामुळे या विषयांचे कच्चे ज्ञान नंतर कोणत्याही क्षेत्रात पदार्पण करतांना त्रासदायक ठरते व अडथळयाप्रमाणे आड येते. त्यामुळेच सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये सामान्य ज्ञान, गणित, इंग्रजी, मराठी यासारखे विषय शिकविण्याकरिता शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे आढळून आले. प्रशिक्षण कालावधीमध्ये शारिरीक प्रशिक्षणाबरोबर जरुरीपुरते बौध्दिक मार्गदर्शन करण्याचा या संस्थांचा प्रयत्न क्षेत्रीय पाहणीत आढळून आला. त्याकरिता शिक्षकांची नेमणूक केली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे.

### तक्ता क्र.४.३
### सैन्य व पोलीस दल सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रातील प्रवेश घेतलेल्या व प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींची आकडेवारी

| अ. क. | केंद्राचे नांव | एकूण सत्रे | प्रवेश घेतलेले प्रशिक्षणार्थी | | | | प्रशिक्षण पूर्ण केलेले प्रशिक्षणार्थी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ |
| १. | नाशिक, जि,नाशिक | १० | ४५ | ३८ | ५६ | ४० | ४५ | ३८ | ४८ | ३५ |
| | | - | - | ३१ | ५८ | ४५ | - | ३१ | ४६ | २१ |
| | | - | - | ४९ | ४६ | ४३ | - | ४८ | ३४ | ३३ |
| २. | नंदूररबार, जि.धुहे | ९ | ५८ | ५७ | १८ | २१ | ४८ | ४२ | १४ | १४ |
| | | | - | ४० | ४५ | ३५ | - | २६ | ३० | २४ |
| | | | - | - | ४६ | ३३ | - | - | २६ | २४ |
| ३. | चंद्रपूर, जि.चंद्रपूर | ६ | ६९ | ६९ | ५८ | ६७ | ६९ | ६९ | ५८ | ६७ |
| | | | - | - | ७० | - | - | - | ७० | - |
| | | | - | - | ६० | - | - | - | ६० | - |
| ४. | धारणी, जि.अमरावती | ६ | १०० | १०० | १०० | ५० | १०० | १०० | १०० | ५० |
| | | | - | - | १०० | ५० | - | - | १०० | ५० |
| ५. | किनवट, जि.नांदेड | ५ | ४६ | ३६ | ५६ | ७४ | ४६ | ३६ | ३६ | ७४ |
| | | | - | - | - | ३५ | - | - | - | ३५ |
| ६. | जव्हार, जि.ठाणे | १० | - | ३३ | २८ | ५२ | - | ३३ | २८ | ५२ |
| | | | - | ५७ | २८ | ६५ | - | ५७ | २८ | ६५ |
| | | | - | २२ | २८ | - | - | २२ | २८ | - |
| | | | - | ३७ | ५२ | - | - | ३७ | ५२ | - |
| ७. | घोडेगांव, जि.पुणे | ८ | - | ५० | ५३ | २१ | - | ४१ | ४० | २१ |
| | | | - | ४७ | ५१ | ६१ | - | ४४ | ४६ | ६१ |
| | | | - | ४४ | ६४ | - | - | ३० | ४४ | - |
| ८. | वडसा, जि.गडचिरोली | ७ | ६२ | ३४ | ४० | १९ | ६२ | ३४ | ४० | १९ |
| | | | - | ३४ | ४९ | ३९ | - | ३४ | ४९ | ३९ |
| ९. | तळोदा, जि.धुळे | २ | ६९ | ४५ | - | - | ६० | ४५ | - | - |
| एकूण | | | ४४९ | ८२३ | ११०६ | ७५० | ४३० | ७६७ | ९७७ | ६८४ |
| टक्केवारी | | | | | | | ९५% | ९३% | ८८% | ९१% |

४.५ उपरोक्त तक्त्यामध्ये सत्रानुसार प्रवेश घेतलेले विद्यार्थी व प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींची सांख्यिकी आकडेवारी निर्देशित केलेली आहे. सैन्य व पोलीस दलातील भरतीकरिता सेवापूर्व प्रशिक्षण देणाऱ्या एकूण नऊ केंद्रांचा समावेश या तक्त्यामध्ये केला आहे. प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थींच्या आकडेवारीची प्रशिक्षण पूर्ण केलेल्या आकडेवारीची तुलना केली असता प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या आदिवासी युवकांचे प्रमाण अत्यंत समाधानकारक असल्याचे जाणवते. सन १९८९-९० या वर्षामध्ये ९५ टक्के प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण पूर्ण केले. सन १९९०-९१ मध्ये प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्यांचे प्रमाण ९३ टक्के होते. सन १९९१-९२ मध्ये ८८ टक्के प्रशिक्षणार्थींनी आपले प्रशिक्षण व्यवस्थित पूर्ण केले. तर १९९२-९३ मध्ये प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींची टक्केवारी ९१ टक्के असल्याचे संदर्भीय तक्त्यावरुन स्पष्ट होते. या चारही वर्षामध्ये प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींची आकडेवारी ७५ टक्के च्या पुढे जाते. या प्रशिक्षणाकरिता येणाऱ्या आदिवासी युवकांची १. शैक्षणिक व कौटुंबिक पार्श्वभूमी. २. त्यांना घराबद्दल असणारी ओढ. व ३. प्रशिक्षण संस्थामधील शिस्त लक्षात घेता प्रशिक्षण व्यवस्थितरित्या पूर्ण करणाऱ्या युवकांचे प्रमाण नक्कीच समाधानकारक आहे, असेच म्हणावे लागेल.

तक्ता क्र.४.४

सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रामधील प्रशिक्षणार्थींची सांख्यिकी माहिती दर्शविणारा तक्ता


| अ. क. | प्रशिक्षण केंद्राचे नांव | एकूण सत्रे | एकूण प्रशिक्षणार्थी | | | | प्रशिक्षण अर्धवट सोडून गेलेल्यांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ |
| १. | नाशिक, जि,नाशिक | १० | ४५ | ३८ | ५६ | ४० | - | - | ०८ | ०५ |
| | | - | - | ३१ | ५८ | ४५ | - | - | १२ | २४ |
| | | - | - | ४९ | ४६ | ४३ | - | १ | १२ | १० |
| २. | नंदूररबार, जि.धुहे | ९ | ५८ | ५७ | १८ | २१ | - | - | ५ | ७ |
| | | | - | ४० | ४५ | ३५ | १० | १५ | ५ | ७ |
| | | | - | - | ४६ | ३३ | - | १४ | १५ | ११ |
| ३. | चंद्रपूर, जि.चंद्रपूर | ६ | ६९ | ६९ | ५८ | ६७ | - | - | २० | ९ |
| | | | - | - | ७० | - | - | - | - | - |
| | | | - | - | ६० | - | - | - | - | - |
| ४. | धारणी, जि.अमरावती | ६ | १०० | १०० | १०० | ५० | - | - | - | ८ |
| | | | - | - | १०० | ५० | - | - | - | - |
| ५. | किनवट, जि.नांदेड | ५ | ४६ | ३६ | ५६ | ७४ | - | - | - | - |
| | | | - | - | - | ३५ | - | - | - | - |
| ६. | जव्हार, जि.ठाणे | १० | - | ३३ | २८ | ५२ | - | - | - | - |
| | | | - | ५७ | २८ | ६५ | - | - | - | - |
| | | | - | २२ | २८ | - | - | - | - | - |
| | | | - | ३७ | ५२ | - | - | - | - | - |
| ७. | घोडेगांव, जि.पुणे | ८ | - | ५० | ५३ | २१ | - | ९ | १९ | - |
| | | | - | ४७ | ५१ | ६१ | - | ३ | ५ | - |
| | | | - | ४४ | ६४ | - | - | १४ | २० | - |
| ८. | वडसा, जि.गडचिरोली | ७ | ६२ | ३४ | ४० | १९ | - | - | - | - |
| | | | - | ३४ | ४९ | ३९ | - | - | - | २ |
| ९. | तळोदा, जि.धुळे | २ | ६९ | ४५ | - | - | - | - | - | - |
| एकूण | | | ४४९ | ८२३ | ११०६ | ७५० | १० | ५६ | १२१ | ८३ |

४.६ उपरोक्त तक्ता हा प्रशिक्षण अर्धवट सोडून गेलेल्या प्रशिक्षणार्थींची माहिती निर्देशित करणारा आहे. प्रशिक्षणात प्रवेश दिल्यानंतर १. प्रशिक्षणामध्ये मन न रमणे २. अन्य ठिकाणी नोकरी लागणे ३. घरच्यांनी अडीअडचणींच्यावेळी बोलावून घेणे. ४. नोकरीची हमी न मिळणे या कारणामुळे उपरोक्त प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण अर्धवट सोडून गेले आहेत. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांच्या तुलनेमध्ये प्रशिक्षण अर्धवट सोडून जाणाऱ्यांची आकडेवारी किरकोळ असली तरी प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण अर्धवट सोडून जाऊ नये याकरिता शिबिर प्रमुखांनी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणांचा कालावधी हा फक्त चार महिन्याचा आहे तर वाहनचालक प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्यांचा आहे.इतक्या अल्पावधीत उपरोक्त कारणामुळे प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण सोडून जात असतील तर तसे करण्यापासून त्यांना परावृत्त करणे ही शिबिर प्रमुखांची जबाबदरी ठरते. चार महिन्यांकरिता प्रवेश दिलेल्या प्रशिक्षणार्थींपैकी १०० टक्के विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण करावे, ही शासनाची रास्त अपेक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून शिबिर प्रमुखांना काय प्रयत्न करता येतील याबाबतची चर्चा सूचना व उपाययोजना पुढील प्रकरणात केली आहे.

**तक्ता क्र.४.५**

**सैन्य व पोलीस दल सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षण पूर्ण केलेले व पूर्ण करुन नोकरी मिळालेल्या प्रशिक्षणार्थींची सांख्यिकी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क. | केंद्राचे नांव | एकूण सत्रे | प्रशिक्षण पूर्ण केलेले प्रशिक्षणार्थी | | | | प्रशिक्षण पूर्ण करुन नोकरीस लागलेले प्रशिक्षणार्थी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ |
| १. | नाशिक, जि,नाशिक | १० | ४५ | ३८ | ४८ | ३५ | २७ | ३४ | २६ | १० |
| | | - | - | ३१ | ४६ | २१ | - | २४ | २३ | ११ |
| | | - | - | ४८ | ३४ | ३३ | - | ४४ | १० | १२ |
| २. | नंदूररबार, जि.धुहे | ९ | ४८ | ४२ | १४ | १४ | ३४ | ३५ | ६ | ४ |
| | | | - | २६ | ३० | २४ | - | ५३ | २३ | १६ |
| | | | - | - | २६ | २४ | - | - | ८ | १३ |
| ३. | चंद्रपूर, जि.चंद्रपूर | ६ | ६९ | ६९ | ५८ | ६७ | २६ | २८ | ४३ | २ |
| | | | - | - | ७० | - | - | - | - | - |
| | | | - | - | ६० | - | - | - | - | - |
| ४. | धारणी, जि.अमरावती | ६ | १०० | १०० | १०० | ५० | ७ | ४१ | ११ | - |
| | | | - | - | १०० | ५० | - | - | ८ | - |
| ५. | किनवट, जि.नांदेड | ५ | ४६ | ३६ | ३६ | ७४ | २७ | १० | .४ | २ |
| | | | - | - | - | ३५ | - | - | - | ७ |
| ६. | जव्हार, जि.ठाणे | १० | - | ३३ | २८ | ५२ | - | २१ | - | - |
| | | | - | ५७ | २८ | ६५ | - | - | - | - |
| | | | - | २२ | २८ | - | - | - | १५ | - |
| | | | - | ३७ | ५२ | - | - | २४ | - | - |
| ७. | घोडेगांव, जि.पुणे | ८ | - | ४१ | ४० | २१ | - | १४ | - | ४ |
| | | | - | ४४ | ४६ | ६१ | - | २१ | - | - |
| | | | - | ३० | ४४ | - | - | - | - | - |
| ८. | वडसा, जि.गडचिरोली | ७ | ६२ | ३४ | ४० | १९ | २४ | १५ | ५ | २४ |
| | | | - | ३४ | ४९ | ३९ | - | - | - | - |
| ९. | तळोदा, जि.धुळे | २ | ६० | ४५ | - | - | - | - | - | - |
| **एकूण** | | | ४३० | ७६७ | ९७७ | ६८४ | १४५ | ३२४ | १७२ | १०५ |
| **टक्केवारी** | | | | | | | ३३% | ४२% | १७% | १५% |


Chart Showing Yearwise no. of Trainees, No. of trainees completed training, no. of trainnees selected for service
1200
1000
800
600
400
200
0
No. Of Trainees
1989-90
1990-91
1991-92
1992-93
Year
Admitted for Trainin
Completed Training
Selected For Servic

४.७ तक्ता क.४.५ मध्ये सैन्य व पोलीस भरती सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रामधील प्रशिक्षण पूर्ण करुन नोकरी लागलेल्या प्रशिक्षणार्थींची आकडे टक्केवारीसह स्पष्ट केली आहे. तक्ता क्र.४.५ मधील तक्त्यांशी म्हणजेच प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींची तुलना केली असता प्रशिक्षण पूर्ण करुनही त्यापैकी फारच कमी प्रशिक्षणार्थींना नोकरी लागली असे म्हणावे लागेल. सन १९८९-९० मध्ये ९५ टक्के प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण व्यवस्थित पूर्ण केले. त्यापैकी फक्त ३३ टक्के प्रशिक्षणार्थींना नोकऱ्या मिळाल्या. सन १९९०-९१ मध्ये ९३ टक्के प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण पूर्ण केले आणि ४२ टक्के प्रशिक्षणार्थी नोकरीस लागले. १९९१-९२ मध्ये ८८ टक्के प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण पूर्ण केले असता त्यातील १७ टक्के प्रशिक्षणार्थींना नोकऱ्या मिळाल्या पण १९९२-९३ मध्ये नोकरी मिळालेल्या प्रशिक्षणार्थींची टक्केवारी आणखीनच खाली घसरल्याचे दिसते. या वर्षात एकूण ९१ टक्के प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण पूर्ण करुनही फक्त १५ टक्के प्रशिक्षणार्थींना नोकऱ्या उपलब्ध होऊ शकल्या. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना लगेच नोकरी मिळावी, अशी अपेक्षा असते. दिवसेंदिवस नोकऱ्या जास्त संख्येने उपलब्ध होण्याऐवजी इथे मात्र प्रशिक्षण व्यवस्थित पूर्ण करुनही नोकऱ्या उपलब्ध होण्याचे प्रमाण घटत चालल्याचे लक्षात येते.

तक्ता क.४.६

प्रशिक्षण पूर्ण करुन नोकरीस न मिळालेल्या प्रशिक्षणार्थींची आकडेवारी

| अ.क. | प्रशिक्षण केंद्राचे नाव | एकूण सत्रे | प्रशिक्षणासाठी जागांची क्षमता | | | | प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्यांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ |
| १. | नाशिक, जि,नाशिक | १० | ४५ | ३८ | ४८ | ३५ | १८ | ४ | २२ | २५ |
| | | - | - | ३१ | ४६ | २१ | - | ७ | २३ | १० |
| | | - | - | ४८ | ३४ | ३३ | - | ४ | २४ | २१ |
| २. | नंदूररबार, जि.धुहे | ९ | ४८ | ४२ | १४ | १४ | १४ | ७ | ८ | १० |
| | | | - | २६ | ३० | २४ | - | १३ | १७ | ८ |
| | | | - | - | २६ | २४ | - | - | १८ | ११ |
| ३. | चंद्रपूर, जि.चंद्रपूर | ६ | ६९ | ६९ | ५८ | ६७ | ४३ | ४१ | १५ | ६५ |
| | | | - | - | ७० | - | - | - | ७० | - |
| | | | - | - | ६० | - | - | - | ६० | - |
| ४. | धारणी, जि.अमरावती | ६ | १०० | १०० | १०० | ५० | १३ | ५९ | ८९ | ५० |
| | | | - | - | १०० | ५० | - | - | ९२ | ५० |
| ५. | किनवट, जि.नांदेड | ५ | ४६ | ३६ | ३६ | ७४ | - | - | - | - |
| | | | - | - | - | ३५ | - | - | - | - |
| ६. | जव्हार, जि.ठाणे | १० | - | ३३ | २८ | ५२ | - | - | - | - |
| | | | - | ५७ | २८ | ६५ | - | - | - | - |
| | | | - | २२ | २८ | - | - | - | - | - |
| | | | - | ३७ | ५२ | - | - | - | - | - |
| ७. | घोडेगाव, जि.पुणे | ८ | - | ४१ | ४० | २१ | - | - | - | - |
| | | | - | ४४ | ४६ | ६१ | - | - | - | - |
| | | | - | ३० | ४४ | - | - | - | - | - |
| ८. | वडसा, जि.गडचिरोली | ७ | ६२ | ३४ | ४० | १९ | - | - | - | - |
| | | | - | ३४ | ४९ | ३९ | - | - | - | - |
| ९. | तळोदा, जि.धुळे | २ | ६० | ४५ | - | - | - | - | - | - |
| एकूण | | | ४३० | ७६७ | ९७७ | ६८४ | ८८ | २२३ | ४३८ | २५० |
| टक्केवारी | | | | | | | २०% | २९% | ४४% | ३६% |

४.८ तक्ता क्र.४.६ मध्ये प्रशिक्षण पूर्ण करुन नोकरी न मिळालेल्या प्रशिक्षणार्थींची टक्केवारी विशद केली आहे. १९८९-९० या वर्षी ९५ टक्के उमेदवारांनी शिक्षण पूर्ण केले. त्यापैकी ३३ टक्के प्रशिक्षणार्थींना नोकरी मिळाली तर २० टक्के उमेदवारांन प्रशिक्षण पूर्ण करुनही नोकरी मिळाली नाही. १९९०-९१ मध्ये ९३ टक्के प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण पूर्ण केले. त्यापैकी ४२ टक्के उमेदवारांना नोकरी लागली तर २९ टक्के उमेदवार नोकरीपासून वंचित रालि. १९९१-९२ मध्ये ८८ टक्के प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण पूर्ण केले.त्यापैकी फक्त १७ टक्के लोकांना नोकऱ्या मिळाल्या तर जवळजवळ ४४ टक्के उमेदवारांना नोकऱ्या मिळू शकल्या नाहीत. १९९२-९३ मध्ये ९१ टक्के प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण व्यवस्थित पूर्ण करुनही फक्त १५ टक्के उमेदवारांना नोकरी मिळाली आणि ३६ टक्के उमेदवारांना नोकऱ्या उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. हा तक्ता देखील प्रशिक्षणा पूर्ण करणाऱ्या बहुसंख्य उमेदवारांना नोकऱ्या मिळत नाहीत या विधानाला पुष्टी देणारा आहे. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यामागचा हेतू अनुशेष भरुन काढणे हा असताना येथे या उमेदवारांना नोकऱ्या उपलब्ध का होत नाहीत, हा प्रश्न उद्भवतो. कसा याबाबत आश्चर्य वाटणे साहजिकच आहे. या विषयावरील उहापोह आपण पुढील प्रकरणामध्ये केला आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या वाहनचालक पदासाठी प्रशिक्षण देणाऱ्या केंद्राची व प्रशिक्षणार्थींची सांख्यिकी माहिती निर्देशित करणारा तक्ता

तक्ता क्र.४.७

| अ. क. | केंद्राचे नांव | एकूण सत्रे | प्रशिक्षणासाठी जागांची क्षमता | | | | प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ |
| १. | वाहनचालक प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा, जि.यवतमाळ | ६ कालावधी ६ महिने | ५०<br>५० | ५०<br>५० | -<br>- | ५०<br>५० | ३७<br>२४ | ३०<br>३५ | -<br>- | ३५<br>३७ |
| २. | वाहनचालक प्रशिक्षण विद्यालय, तळेगांव दाभाडे, पुणे | १३ कालावधी ३ महिने | ४५<br>४५<br>४५ | ४५<br>४५<br>४५ | ४५<br>४५<br>४५ | ४५<br>४५<br>४५<br>४५ | ४७<br>४०<br>४६ | ४०<br>४४<br>४४ | ४०<br>२८<br>२५ | २५<br>३५<br>४२<br>२३ |

४.९ उपरोक्त तक्त्यामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या वाहनचालकांच्या पदांकरिता प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची माहिती नमूद केली आहे. यापैकी पहिली संस्था वाहनचालक प्रशिक्षण केद्र, **पांढरकवडा, जि.यवतमाळ** ही आदिवासी विकास विभागाने दि.५ जुलै १९९० पासून सुरु केली असून तिला राज्य परिवहन महामंडळाचे ३० टक्के अनुदानही मिळते. या ठिकाणी प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्यांचा असून येथे विद्यार्थ्यांना मोफत राहण्याची व्यवस्था केली जाते. प्रशिक्षणार्थींना भोजनासाठी दरमहा दरडोई रु.३०० + १५० = ४५० रुपये निर्वाह भत्ता (स्टायपेंड) देण्यात येतो. या रक्कमेतील ३००/- रुपये आदिवासी विकास विभागाकडून तर १५०/- रु. राज्य परिवहन महामंडळाच्या निधीतून मिळतात. या व्यतिरिक्त प्रशिक्षणार्थींना विनामूल्य वैद्यकिय सेवा पुरविली जाते. तसेच विद्यार्थ्यांना मनोरंजन व प्रशिक्षणाकरिता रेडिओ तसेच खेळाचे साहित्य पुरविण्यात येते.

असे असतानाही संस्थेच्या एकूण क्षमतेपेक्षा प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या ही कमी असल्याचे जाणवते. संस्थेची नवीन इमारत तेथील अदयावत यंत्रसामुग्री चा त्यामुळे पूर्ण विनियोग होत नसल्याचे क्षेत्रीय पाहणीच्या वेळी

लक्षांत आले. १) १९८९-९० या कालावधीत प्रथम सत्राच्या वेळी ७४% तर दुसऱ्या सत्रात एकूण क्षमतेच्या फक्त ४८ टक्के प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात आला. २) १९९०-९१ या कालावधीत प्रथम सत्राच्या वेळी ६० टक्के प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात आला तर दुसऱ्या सत्रात ७० टक्के प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात आला. ३) १९९१-९२ मध्ये एकही प्रशिक्षण सत्र आयोजित केले गेले नव्हते . ४) १९९२-९३ मध्ये प्रथम सत्रात ७० टक्के तर दुसऱ्या सत्रात ७४ टक्के प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात आला. म्हणजेच जवळजवळ पदांची २५ टक्के क्षमता ही एकाही सत्रात उपयोगात आणली गेली नाही.

याच तक्त्यामधील दुसऱ्या क्रमांकाची संस्था पुणे जिल्हयातील तळेगांव दाभाडे येथील राज्य परिवहन महामंडळाची वाहनचालक प्रशिक्षण विद्यालय ही आहे. राज्य परिवहन मंडळाच्या अख्त्यारीतील ही संस्था २२ जानेवारी, १९७९ पासून सुरु आहे. अनुसूचित जाती-जमातीमधील वाहनचालक पदाचा अनुशेष भरुन काढण्याच्या उद्देशाने ही संस्था सुरु करण्यात आली. या संस्थेतील क्षमता आणि प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या यांचा अभ्यास केला असता पुढील बाबी निदर्शनास येतात.

१. १९८९-९० या वर्षात प्रथम सत्रात १०० टक्के पेक्षा जास्त क्षमतेपेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात आला. यावर्षी द्वितीय सत्रात ८८ टक्के प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात आला तृतीय सत्रातही १०० टक्केपेक्षा जास्त म्हणजे क्षमतेपेक्षाही जास्त प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात आला.

२. १९९०-९१ या वर्षी प्रथम सत्रात ८८ टक्के प्रशिक्षणार्थींना तर द्वितीय सत्रात ९७ टक्के प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात आल्याचे निदर्शनास येते.

३. १९९१-९२ या वर्षी प्रथम सत्रात ८८ टक्के, द्वितीय सत्रात ६२ टक्के तर तृतीय सत्रात ५५ टक्के प्रशिक्षणार्थींना प्रेवश दिल्याचे निदर्शनास आले.

४. १९९२-९३ या वर्षात प्रथम सत्रात ५५ टक्के, द्वितीय सत्रात ७७ टक्के, तृतीय सत्रात ९२ टक्के तर चौथ्या सत्रात ५१ टक्के प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात आला असल्याचे आढळले.

**४.१०** वाहनचालक प्रशिक्षण विद्यालय, तळेगांव दाभाडे ही संस्था राज्य परिवहन मंडळाची असून येथे प्रशिक्षण कालावधी तीन महिन्याचा आहे. येथे विद्यार्थ्यांना फक्त रु.१५०/- निर्वाहभत्ता देण्यात येतो. पांढरकवडा येथील आदिवासी विकास विभागाच्या वाहनचालक यप्रशिक्षण केंद्राशी या संस्थेची तुलना केली असता पांढरकवडा येथील प्रशिक्षण केंद्र हे जास्त सुसज्ज व अद्यायावत असल्याचे आढळते. असे असतानाही तळेगांव दाभाडे येथील राज्य परिवहन महामंडळांच्या संस्थेमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रशिक्षणार्थी घेतले जातात तर पांढरकवडा येथील प्रशिक्षण शिबिरात प्रत्येक सत्रात संस्थेची २५ टक्के क्षमता पूर्णत: उपयोगात आणली जात नसल्याचे आढळते. याचा कार्यकारणभाव काय असावा या विषयीचा उहापोह पुढील प्रकरणामध्ये करण्यात आला आहे.

### आदिवासी विकास विभाग व राज्य परिवहन महामंडळाच्या दोन स्वतंत्र वाहनचालक प्रशिक्षण संस्थामधील प्रत्यक्ष प्रवेश, प्रशिक्षण अर्धवट सोडून गेलेले प्रशिक्षणार्थी यांची तुलना करणारा तक्ता

तक्ता क्र.४.८

| अ. क. | केंद्राचे नांव | एकूण सत्रे | प्रशिक्षणासाठी जागांची क्षमता | | | | प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ |
| १. | वाहनचालक प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा, जि.यवतमाळ | ६ | ३७<br>२४ | ३०<br>३५ | -<br>- | ३५<br>३७ | १२<br>३ | -<br>४ | -<br>- | २<br>- |
| २. | वाहनचालक प्रशिक्षण विद्यालय, तळेगांव दाभाडे, पुणे | १३ | ४७<br>४०<br>४६ | ४०<br>४४<br>४४ | ४८<br>२८<br>२५ | २५<br>३५<br>४२<br>२३ | -<br>-<br>-<br>- | -<br>-<br>-<br>- | -<br>-<br>-<br>- | -<br>-<br>-<br>५ |

**४.११** उपरोक्त तक्तयामध्ये दोन्ही वाहनचालक प्रशिक्षण संस्थामधील प्रशिक्षण अर्धवट सोडून जाणाऱ्या प्रशिक्षणार्थींची संख्या निर्देशित केलेली आहे. या तक्त्यांचा अभ्यास केला असता दोन्ही संस्थापैकी पांढरकवडा येथील संस्थेमधील प्रशिक्षण अर्धवट सोडून जाणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण हे तुलनेने जास्त असल्याचे लक्षात येते. १९८९ ते१९९३ या चार वर्षात पांढरकवडा येथे एकूण १९८ प्रशिक्षणार्थी होते. त्यापैकी २१ प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण सोडून गेले. तर १९८९ ते ९३ या वर्षात तळेगांव दाभाडे येथील राज्य परिवहन महामंडळाच्या संस्थेत एकूण ४८७ प्रशिक्षणार्थी होते व त्यापैकी ५ प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण सोडून गेले.म्हणजेच पांढरकवडा येथील वाहनचालक प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण अर्धवट सोडून जाणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्रमाण हे जास्त आढळते, असे आपणास म्हणता येईल. यामागे काय कारणे असावीत, याविषयीचीच चर्चा पुढील निरीक्षण या प्रकरणात केली आहे.

**४.१२** पुढील तक्ता तक्ता क्र.४.९ मध्ये सैन्य, पोलीस व वाहनचालक भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रामधील शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, शिकविण्याचे विषय, शिकवण्याचा अनुभव याबाबतची माहिती निर्देशित केली आहे. या तक्त्यावरुन या प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षकांची गुणवत्ता व दर्जा आपल्या लक्षात येईल.

आदिवासी युवकांना सेवापूर्व प्रशिक्षण देणाऱ्या एकूण संस्था व तेथील शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, विषय, अनुभव यांची माहिती दर्शविणारा तक्ता

तक्ता क्र.४.९

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शिक्षक संख्या | नांव व शैक्षणिक पात्रता | शिकविण्याचे विषय | शिक्षण क्षेत्रातील अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १ | सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक | २ | १. श्री.टी.के.कुंभार, केंद्रप्रमुख, सेवानिवृत्त नायब सुभेदार, सेवादलातील<br>२. श्री.एस.डी.चोथवे सहाय्यक केंद्र प्रमुख,सेनादलातील निवृत्त नायब सुभेदार | गणित, सामान्यज्ञान, शारिरिक प्रशिक्षण | माजी सैनिक<br>माजी सैनिक |
| २. | सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, नंदूरबार | २ | १. श्री.बी.पी.माळी एस.एस.सी. सेवानिवृत्त कंपनी हवालदार मेजर<br>२. श्री.आर.एस.चौधरी एस.एस.सी.सेवानिवृत्त (कारपोलर) नाईक | शारिरिक व बौध्दीक<br>शारिरीक व बौध्दीक | सैन्यामध्ये नाईक म्हणून उमेदवारांना प्रशिक्षण देण्याचा ५ वर्षाचा अनुभव<br>सैन्यामध्ये नाईक म्हणून उमेदवारांना प्रशिक्षण देण्याचा ५ वर्षाचा अनुभव |
| ३. | भरतीपूर्व पोलीस प्रशिक्षण केंद्र, राजूरा, जि.चंद्रपूर | ३ | १. श्री.एन.एस.कळसे बी.ए.बी.एड.सेवानिवृत्त गट शिक्षण अधिकारी<br>२. श्री.महंमद यासील महंमद शागीर, शारिरीक प्रशिक्षक, सेवानिवृत्त होमगार्ड, एस.एस.सी.<br>३. श्री.आर.एस.काटकर सहायक प्रशिक्षक सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक | सामान्य ज्ञान, गणित, इंग्रजी, बौध्दीक मार्गदर्शन<br>मैदानावरील प्रशिक्षण शारिरीक प्रशिक्षण<br>मैदानावरील प्रशिक्षण शारिरीक प्रशिक्षण | शिक्षण क्षेत्रातील शिकवणीचा व तपासणीचा अनुभव,<br>होमगार्डना प्रशिक्षण देण्याचा अनभुव<br>पोलीस प्रशिक्षणार्थींना शिकविण्याचा अनुभव |
| ४. | सैन्य पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, धारणी | ३ | १. श्री.एस.डी.सुखदेवे एम.कॉम.बी.पी.एड.<br>२. श्री.एस.एम.गिरी, एम.कॉम<br>३. श्री.एम.एद.द्रव्यकार, एम.ए.बी.एड. | शारिरीक शिक्षक<br>सामान्य ज्ञान गणित<br>इंग्रजी/मराठी | बी.पी.एड.<br>-<br>जिल्हा परिषद शाळेतील निवृत्त शिक्षक |

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शिक्षक संख्या | नांव व शैक्षणिक पात्रता | शिकविण्याचे विषय | शिक्षण क्षेत्रातील अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| ५. | पोलीस दला व लष्कर भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, किनवट, नांदेड | ६ | १. श्री.जे.एस.पठाण बी.ए.बी.पी..एड.<br>२. श्री.जी.एम.नागपुरे बी.ए.पी.एड.<br>३. श्री.एस.एस.चारे एम.ए.बी.एड. | शारिरीक शिक्षण<br>मराठी अध्यापन<br>इंग्रजी अध्यापन | शाळा व महाविद्यालयातील ५ वर्षाचा अनुभव<br>शाळा व महाविद्यालयातील ५ वर्षाचा अनुभव<br>शाळा व महाविद्यालयातील ५ वर्षाचा अनुभव |
| | | | ४. श्री.एन.एन.बनशेवकीकर एम.ए.बी.एड.<br>५. श्री.जी.बी.लांबे एमएस्सी.बीएड.<br>६. विलास बेले | सामान्य ज्ञान व इ मार्गदर्शन<br>गणित<br>मदतनीस | ५ वर्षाचा<br>५ वर्षाचा<br>- |
| ६. | सैन्य पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र जव्हार | २ | १. श्री.सातपुते<br>२. श्री.आर.पी.पाटील, एम.ए.बी.एड. | पी.टी व परेड प्रशिक्षणाचे महत्व व भरतीपूर्व उमेदवारांची तयारी करुन घेणे,<br>सामान्य ज्ञान | -<br>जव्हार महाविद्यालयात ५ वर्ष शिकवण्याचा अनुभव |
| ७. | सैन्य व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र, पळसटिका, घोडेगांव | २ | १. श्री.शंकर शिंदे, माजी सुभेदार, आर्मी एज्युकेशन, सिव्हीलच्या एन..एस.सी..ला अनुसरुन<br>२. श्री.भास्कर दयाराम पाटील. माजी ऑडिनरी, सुभेदार (नाईक) | ड्रील, पी.टी.फिल्ड क्राफट, सामान्य ज्ञान, प्रशासकीय कामे, अनुशासन<br>ड्रील, पी.टी.फिल्ड क्राफट, सामान्य ज्ञान, प्रशासकीय कामे, अनुशासन | कोअर ऑफ इंजिनिअरींगच्या संपूर्ण आर्मीचा अभ्यासक्रम २३ वर्ष सर्व्हिस अनुभव<br>२६ वर्षाचा अनुभव |
| ८. | सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र, वडसा | ३ | १. श्री.डी.के.पिलारे, बी.एस्सी.<br>२. श्री.एच.एन.कसारे, बी.ए.बी.एड.<br>३. श्री.पी.टी.उरकुडे | गणित<br>इंग्रजी<br>सामान्य विज्ञान | १० वर्षाचा अनुभव<br>१० वर्षाचा अनुभव<br>१० वर्षाचा अनुभव |
| ९. | रोजगार पूर्व प्रशिक्षण केंद्र, तळोदा, जि.धुळे | ४ | श्री,एस.एस.शिंदे, शिबिर प्रमुख, एस्र.एस.सी. सेवानिवृत्त नायक<br>२. श्री.एन.एस.वानखेडे<br>३. श्री.वाय.बी.भामरे सेवानिवृत्त नायक सुभेदार<br>४.श्री.हिरालाल पाटील, एस्र.एस.सी., सेवानिवृत्त हवालदार | शारिरीक व बौध्दीक प्रशिक्षण देणे<br>मदतनीस<br>शारिरीक क्षमता वाढविणे<br>प्रशिक्षक | प्रशिक्षक म्हणून अनुभव<br>भारतीय वायुसेवेत पोलीस ट्रेनिंग चे प्रशिक्षण दिले.<br>नागपूर कमिटी येथे ट्रेनि शिक्षकांना प्रशिक्षण<br>बॉम्बे इंजिनिअर ग्रुप पुणे येथे प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याचा अनुभव |

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शिक्षक संख्या | नांव व शैक्षणिक पात्रता | शिकविण्याचे विषय | शिक्षण क्षेत्रातील अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १० | वाहनचालक प्रशिक्षण विद्यालय, यवतमाळ | ३ | १. श्री.प्र.द.पितळे, प्राचार्य, एस,एस.सी.<br>२. श्री.आर.के.चौरसिया एम.कॉम.<br>३. श्री.सी.आर.आबले. बी.ए. वाहतूक निरीक्षक | सुरक्षित वाहनचालविण्यासंबंधी माहिती, वाहनाचे कार्यासंबंधी माहिती, चालक सरावाबाबत सविस्तर माहिती | प्रशिक्षकांनी सदर मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, राज्य परिवहन मंडळ, भोसरी येथील स्पेशल ट्रेनिंग पूर्ण केलेला असावा. |
| ११. | चालक प्रशिक्षण विद्यालय. तळेगांव, जि.पुणे | ३ | १. श्री.एस.बी.जाधव, बीए.ऑनर्स<br>२. श्री.डी.जी.चौधरी, ऑनररी कॅप्टन निवृत्त. एस.एस.सी.<br>३. श्री. व्ही.वाय.पेटकर<br>४. एस.डी.जमदाडे | बौध्दीक वाहतूक व अंतांत्रिक विषय<br>Mechanism तांत्रिक -अ<br>वाहतूक<br>अतांत्रिक | १९८५ पासून शिकवण्याचा अनुभव<br>१९८४ पासून शिकवण्याचा अनुभव<br>त्या आधी मिल्ट्री आर्मी स्कूल येथे शिकवण्याचा अनुभव<br>१३ वर्षापासूनचा अनुभव<br>१३ वर्षापासूनचा अनुभव |

४.१३ उपरोक्त तक्त्यावरुन हे विशद होते की, जवळ जवळ सर्व संस्थांनी शारिरीक क्षमता व बौध्दीक विषयांकरिता आवश्यकतेनुसार प्रशिक्षक नेमले आहेत. सेवापूर्व परीक्षा, स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करुन घेण्याकरिता या विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञान, गणित, इंग्रजी हे विषय शिकविले जातात.तसेच शारिरीक कसरती व कवायती देखील नियमित करुन घेतल्या जातात. वाहनचालक प्रशिक्षण केंद्रातही तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्याकरिता त्या त्या केंद्रातील अनुभवी प्रशिक्षक नेमले आहेत. याबरोबरच या प्रशिक्षणार्थींना समृध्द अनुभवविश्व देण्याकरिता बाहेरुन तज्ञ व्याख्याते बोलावणे आवश्यक वाटते. काही एक दोन संस्था सोडल्या तर अन्य संस्थांनी बाहेरुन व्याख्याते बोलविल्याचे आढळून आले नाही.

४.१४ उपरोक्त सांख्यिकी आकडेवारीचे तक्तीकरण हे या सर्व प्रशिक्षण केंद्राची माहिती सुस्पष्टरित्या विश्लेषित करतात. पण याशिवाय क्षेत्रीय पाहणीमध्ये ज्या बाबी आढळल्या त्या पुढील प्रकरणामध्ये नमूद केल्या आहेत.

## प्रकरण क.५

## निरीक्षणात्मक बाबी

५.१ या मूल्यमापन अहवालाकरिता संशोधन गटाने एकूण नऊ सेवापूर्व (सैन्य व पोलीस दल भरती) प्रशिक्षण केंद्रांना भेट दिली. तसेच दोन वाहनचालक प्रशिक्षण केंद्रांना भेट दिली. यातील पुणे जिल्हयातील तळेगांव दाभाडे येथील वाहनचालक प्रशिक्षण केंद्र हे राज्य परिवहन महामंडळाच्या अख्त्यारीतील असून अन्य दहा केंद्र आदिवासी विकास विभागाने चालविलेली आहेत. अशा एकूण अकरा सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रांना भेट दिली असता असे लक्षात आले की, आदिवासी विकास विभागाच्या दहा केंद्रामध्ये केंद्राची पूर्ण क्षमता उपयोगात आणली जात नाही. या केंद्रामधील पदांची क्षमता आणि प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या यांची पडताळणी केली असताना सन १९८९ ते९३ या कालावधीत जवळ जवळ २२ टक्के ते ५१ टक्के पर्यंत प्रवेश न दिल्यामुळे पदे रिक्त राहत असल्याचे निदर्शनास आले. सैन्य व पोलीस दलांकरिता ८ वी पास व वाहनचालक पदांकरिता ७ वी पास हा निकष असतांना तसेच शारिरीक क्षमतांबाबत वजन ४८ कि.ग्रॅ., छाती ७९-८४ , उंची १६४ से.मी.असा वाजवी निकष असतानाही प्रशिक्षणाकरिता योग्य उमेदवार मिळत नाहीत, असे शिबिर प्रमुखांकडून सांगण्यात आले. उमेदवारांना या निकषानुसार प्रवेश दिला जातो. त्यापैकी काही उमेदवार वैद्यकिय तपासणीमध्ये गळतात, असे त्यांनी सांगितले. या केंद्राकरिता आदिवासी विकास विभागाचा ७० टक्के इतका निधी खर्च होत असतांना , तसेच या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणार्थींना सर्व आवश्यक सोयी सुविधा मोफत पुरवून निर्वाहभत्ता दिला जात असतांना या केद्रामधील २१ ते ५१ टक्केपर्यंत पदे रिक्त राहणे उचित वाटत नाही. या पार्श्वभूमीवर राज्य परिवहन महामंडळाच्या तळेगांव दाभाडे येथील अनुसूचित जाती-जमातींच्या युवकांकरिता चालविल्या जाणाऱ्या वाहनचालक भरतीपूर्व केंद्रामध्ये मात्र क्षमतेपेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींना प्रवेश दिला जातो. या संस्थेला प्रशिक्षणार्थींकडून उत्स्फूर्त प्रतिसादर मिळतो हे येथे नमूद करणे आवश्यक ठरेल. या संस्थेकडून प्रशिक्षणार्थींना कोणत्याही विशेष सवलती दिल्या जात नाहीत. तसेच एका हॉलमध्ये निवास व्यवस्था व फक्त १५०/- रु.निर्वाह भत्ता असताना हा प्रतिसाद आढळला हे ही येथे लक्षात ठेवणे आवश्यक ठरेल.

५.२ जवळ जवळ सर्व प्रशिक्षण केंद्र प्रमुखांनी अनुसूचित जमातीतील मुले शैक्षणिक पात्रतेमध्ये व शारिरीक क्षमतेमध्ये कमी पडत असल्याचे नमूद केले आहे. जरी चार ते सहा महिने या उमेदवारांना प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून तयारी करुन घेतली जात असली तरी सर्वसाधारण गटातील मुलांपेक्षा ही मुले स्पर्धात्मक परीक्षाकंच्या वेळी अथवा मुलाखतीच्या वेळी मागे राहत असतील ही शक्यता नाकारता येत नाही.

५.३ पांढरकवडा या प्रशिक्षण केंद्रामध्ये क्षमतेपेक्षा कमी उमेदवारांना प्रवेश दिला जातो. पण प्रवेश दिलेल्या प्रशिक्षणार्थ्यांपैकी प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचे प्रमाण हे समाधानकारक असल्याचे निदर्शनास आले. १९८९-९० मध्ये ९५ टक्के, १९९०-९१ मध्ये ९३ टक्के, १९९१-९२ मध्ये ८८ टक्के १९९२-९३ मध्ये ९१ टक्के प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण व्यवस्थित पूर्ण केल्याचे आढळून आले. आदिवासी युवकांना प्रशिक्षण कालावधीत मिळणाऱ्या सोयी सुविधा आणि निर्वाह भत्त्यामुळे प्रशिक्षण व्यवस्थित पूर्ण करणे शक्य होत असल्याचे या उमेदवारांनी सांगितले. तसेच प्रशिक्षण सत्रात प्रवेश मिळाल्यानंतर प्रशिक्षण अर्धवट सोडून जाणाऱ्या उमेदवारांबाबतही माहिती समजली. केंद्र प्रमुखांशी या विषयावर चर्चा केली

असता या युवकांना असलेली घराची ओढ, केंद्रामधील शिस्त, अन्य ठिकाणी काम मिळणे, घरच्यांनी बोलावून घेणे, आदि कारणामुळे हे उमेदवार प्रशिक्षण अर्धवट सोडून जातात व एवढ्या मोठ्या प्रशिक्षणार्थींना अडविणे अथवा परत बोलावून घेणे शक्य होत नाही, असे त्यांनी सांगितले.तळेगांव दाभाडे येथील केंद्र प्रमुखांनी अशावेळी आम्ही अशा मुलांशी पत्रव्यवहार करुन ते अजूनही येऊन प्रशिक्षण पूर्ण करु शकतात, असे कळवित असल्याबद्दल स्पष्ट केले.

५.४ प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यामागील उद्देश अनुसूचित जमातींच्या शासकीय सेवामधील अनुशेष भरुन काढणे हा होता. असे असतानाही प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या युवकांपैकी ५० टक्के युवकांना देखील नोकऱ्या मिळू शकत नाहीत, अशी शोचनीय परिस्थिती सैन्य व पोलीस भरती प्रशिक्षण केंद्राबाबत सध्या निर्माण झालेली दिसते. या उलट तळेगांव दाभाडे येथील वाहनचालक प्रशिक्षण विद्यालय हे राज्य परिवहन महामंडळाच्या अख्यत्यारीतीलच असल्यामुळे त्यांच्या प्रशिक्षण केंदामधून प्रशिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती-जमातींच्या युवकांना १०० टक्के नोकरीची हमी असल्याचे जाणवले. किंबहूना या केंद्रात प्रशिक्षण घेणाऱ्या युवकांना नोकरी देणे, ही केंद्राची जबाबदारी ठरते. असे चित्र आदिवासी विकास विभागाच्या अख्त्यारीतील प्रशिक्षण केद्रामध्ये आढळून आले नाही.

५.५ आदिवासी विकास विभाग व राज्य परिवहन महामंडळ, यांच्या सहकार्याने चालविण्यात येणाऱ्या यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा येथील वाहनचालक प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षणार्थींची निवास व्यवस्था अतिशय उत्तमरितीने केली आहे. येथील प्रशिक्षणाची साधनसामग्री नवीन व अद्ययावत अशी आहेत. या ठिकाणी आदिवासी विकास विभागाकडून रु.३०० व राज्य परिवहन महामंडळाकडून रु.१५०/- असे एकूण रु.४५०/- प्रशिक्षणार्थींना देण्यात येतात. या व्यतिरिक्त वैद्यकिय सेवा मोफत पुरविली जाते, असे असतानाही क्षमतेएवढे प्रशिक्षणार्थी केंद्रास उपलब्ध होऊ शकत नाही.

५.६ राज्य परिवहन महामंडळाच्या अख्त्यारीतील प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षणार्थींना फक्त १५०/- रु. निर्वाहभत्ता दिला जातो. येथील प्रशिक्षणार्थींची निवास व्यवस्था एका छोट्या हॉलमध्ये केलेली आहे. अन्य कोणत्याही सुविधा दिल्या जात नाही, असे असतानाही क्षमतेपेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींना प्रवेश दिला जातो. प्रशिक्षणार्थींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता क्षमतपेक्षा जास्त उमेदवारांना प्रवेश दिला जातो, असे येथील केंद्र प्रमुखांनी अनौपचारिक चर्चा करतांना सांगितले. येथे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थींना राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेमध्ये सहज प्रवेश मिळत असल्यामुळे उमेदवार या केंद्रामध्ये प्रशिक्षण घेण्यास मात्र उत्सुक असावा,असे मत या चर्चेच्या वेळी त्यांनी नमूद केले.

५.७ राज्य परिवहन महामंडळाच्या तळेगांव दाभाडे येथील सेवापूर्व वाहनचालक प्रशिक्षण विद्यालय, आणि आदिवासी विकास विभाग व राज्य परिवहन महामंडळ यांच्या सहकार्याने चालविण्यात येणारे यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा येथील वाहनचालक प्रशिक्षण केंद्र या दोन्ही केदद्रामधील प्रशिक्षण अर्धवाट सोडून गेलेल्या प्रशिक्षणार्थींची तुलना केली असता तळेगांव दाभाडेपेक्षा पांढरकवडा येथे प्रशिक्षण अर्धवट सोडून जाणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याचे लक्षात येते. १९८९ ते ९३ या चार वर्षात पांढरकवडा येथील २१ प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण अर्धवट सोडून निघून गेले तर या चार वर्षात तळेगांव दाभाडे येथील ५ प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण अर्धवट सोडून गेल्याचे आढळले.

५.८ या मूल्यमापन अहवालाकरिता भेट दिलेल्या सर्व म्हणजे एकूण ११ संस्थांमध्ये शारिरीक व बौध्दीक शिक्षण देण्याकरिता प्रशिक्षकांची नेमणूक केली जात असल्याचे निदर्शनास आले. मात्र यातील बौध्दिक शिक्षण देणाऱ्या कितीतरी शिक्षकांची शैक्षणिक पात्रता फक्त एस.एस.सी.असल्याचे, फारशी समाधानकारक नसल्याचे आढळले. तसेच या व्यतिरिक्त बाहेरुन व्याख्याते बोलविण्याचे प्रमाण कमी असल्याचे आढळले.नेमण्यात आलेल्या शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये एकसूत्रता दिसली नाही.

५.९ या प्रशिक्षण केंद्रापैकी काही ठिकाणी केंद्राला स्वत:च्या मालकीची पक्की इमारत व कवायतीसाठी मोठे मैदान व प्रशिक्षणार्थीच्या निवासाकरिता स्वतंत्र खोल्या नसल्याचे आढळले. तसेच या केंद्रामार्फत जे भोजन दिले जाते, त्याबाबत काही प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थींनी तक्रार केली. भोजनात दिले जाणारे पदार्थ व भोजनाचा दर्जा याबाबत या प्रशिक्षणार्थींनी तक्रार नोंदविली. यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा येथील वाहनचालक प्रशिक्षण केंद्रामध्ये याबाबत चांगला पायंडा पाडलेला आढळला. विद्यार्थी त्यांच्या आवडीप्रमाणे स्वत:चे जवेण स्वत: तयार करतात व वाढून घेतात.

५.१० केंद्र प्रमुखांनी अनौपचारिक चर्चेच्या वेळी असे सांगितले की, कित्येकदा प्रशिक्षण वर्ग सुरु होतात पण त्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुंची पूर्वतयारी त्या आधी होत नाही. त्यामुळे प्रशिक्षण कालावधीतील सुरवातीचे दिवस हे वस्तु मिळविण्याकरिता धावाधाव करण्यात जातात. तसेच प्रशिक्षणार्थीपैकी काही मध्येच प्रशिक्षण सोडून जातात. तेव्हा त्यांच्याकडे असलेल्या वस्तुंचा ताळमेळ लावणे नंतर त्रासदायक होते.

५.११ सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेश दिलेल्या बहुसंख्या प्रशिक्षणार्थींनी आपले प्रशिक्षण समाधानकारक रितीने पूर्ण केले असले तरी त्यापैकी बऱ्याच उमेदवारांना नोकऱ्यांअभावी बेकार राहवे लागले आहे. प्रशिक्षण पूर्ण करुनही १९८९ ते ९३ या कालावधीत २० ते ४४ टक्के उमेदवार नोकरीपासून वंचित राहिले असल्याचे सांख्यिकी आकडेवारीवरुन स्पष्ट होते. यामागे या प्रशिक्षणार्थींपर्यंत संबंधित खात्यातील भरतीची माहिती न पोहोचणे, प्रशिक्षण केंद्रांना महाराष्ट्रातील तसेच इतर ठिकाणच्या नोकर भरतीविषयक माहिती वेळेत न मिळणे आदि कारणे आहेत असे आढळले.

५.१२ प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीत भरतीबाबत माहिती कळाली तरी त्याठिकाणी जाण्याकरिता उमेदवांना शासनाच्या खर्चाने पाठविले जाते. परंतू शासनाकडून नियमित निधी उपलब्ध होऊ न शकल्याने काही ठिकाणी भरती चालू असताना सुधदा निधी अभावी प्रशिक्षणार्थींना पाठविता येत नाही. तसेच खुद प्रशिक्षणार्थींची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे स्वखर्चाने ते अशा ठिकाणी जाऊ शकत नाहीत.

५.१३ केंद्र प्रमुखांनी अनौपचारिक चर्चेच्या वेळी असे सांगितले की, कित्येकदा प्रशिक्षण वर्ग सुरु होतात, पण त्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुंची पूर्वतयारी व तरतूद त्या आधी पूर्ण होत नाही. त्यामुळे प्रशिक्षण कालावधीतील सुरवातीचे दिवस हे वस्तु मिळविण्याकरिता धावाधाव करण्यात जातात. तसेच प्रशिक्षणार्थीपैकी काही मध्येच प्रशिक्षण सोडून जातात. तेव्हा त्यांच्याकडे असलेल्या वस्तुंचा ताळेबंद लावणे नंतर त्रासदायक होते.

## प्रकरण क्र.६

## निकर्ष, सूचना तथा शिफारशी

६.१ सैन्य व पोलीस दलातील अनुसूचित जमातीच्या रिक्त पदांचा अनुशेष भरुन काढण्याच्या उद्देशाने सेवापूर्व प्रशिक्षण शिबिरांची स्थापन करण्यात आली. अनुसूचित जमातीतील युवकांची कौटुंबिक व आर्थिक पार्श्वभूमी लक्षात घेता या प्रशिक्षणाचा भार त्यांच्यावर पडू नये याकरिता आदिवासी विकास विभागाकडून उमेदवाराचा प्रशिक्षण कालावधीतील खर्च केला जातो. या उमेदवारांना राहणे-जेवण, निर्वाह भत्ता, प्रशिक्षण कालावधीत भरती चालू असेल, त्या ठिकाणी जाण्याकरिता प्रवासभत्ता, मोफत वैद्यकिय सेवा आदि बाबी पुरविल्या जातात. तसेच स्पर्धात्मक परीक्षा, मुलाखती या ठिकाणी निवड होताना ही मुले मागे पडू नयेत याकरिता या प्रशिक्षणार्थींना शारिरीक व बौध्दीक बाबींचे आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात येते. अतिशय चांगल्या हेतूने सुरु केलेली ही योजना पण हिचे मूल्यमापन व सर्वेक्षण करतांना तिच्यामध्ये काही दोष व त्रुटी आढळल्या. सर्वात महत्वाचे म्हणजे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना नोकरी मिळण्याचे प्रमाण समाधानकारक नसल्याचे आढळले. हे दोष व त्रुटी दूर करण्याकरिता काही उपाययोजना व सूचना इथे सुचविण्यात येत आहेत, त्या अशा-

६.२ सैन्य व पोलीस दलातील अनुशेष भरुन काढण्याकरिता सुरु केलेल्या नऊ सेवापूर्व प्रशिक्षण केंद्राची क्षमता पूर्णत: उपयोगात आणली जात नाही, असे आढळले. सदर केंद्रांना ठरवून दिलेल्या निकषानुसार आवश्यक त्या संख्येने उमेदवार प्राप्त होत नाहीत. आदिवासी युवकांच्या सांस्कृतिक अथवा कौटुंबिक संस्कारांच्या प्रभावामुळे कदाचित ते सैन्य व पोलीस दलाकडे वळण्यास प्रवृत्त होत नाहीत. हे लक्षात घेऊन आदिवासी युवकांना प्रशिक्षण कार्यक्रमांची व योजनांची माहिती करुन देण्याकरिता स्वतंत्र कार्यक्षम यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. सद्यस्थितीमध्ये प्रकल्प अधिकारी, कार्यालयामध्ये जो रोजगार विनिमय विभाग निर्माण करण्यात आला आहे. त्यांच्याकडे हे काम सोपविण्यास हरकत नाही. या विभागाकडे प्रचार यंत्रणा व प्रसिध्दी माध्यमांकरिता काही विशेष निधी देण्यात येऊन आदिवासी पाडयांवर, दुर्गम भागापर्यंत सेवापूर्व प्रशिक्षण कार्यक्रमांचा प्रचार करण्यात यावा.

६.३ केवळ प्रचार माध्यमातून आदिवासी युवक सेवापूर्व प्रशिक्षण घेण्यास उद्युक्त होणार नाही, त्याला आकृष्ट करुन घेण्याकरिता नोकरीची हमी त्याला मिळणे अत्यंत आवश्यक आहे. जिथे अशी नोकरीची हमी दिली जाते त्या राज्य परिवहन महामंडळांच्या प्रशिक्षण संस्थेला इतका प्रचंड प्रतिसाद मिळतो, की त्यांना क्षमतेपेक्षा जास्त उमेदवार घेणे भाग पडते, हे लक्षात घेऊन सैन्य व पोलीस विभागाचा या कार्यात सहभाग घेणे ही एक आवश्यक बाब बनली आहे. त्यांनी या केंद्रातून प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना प्राधान्याने नोकरी देऊ अशी ग्वाही दिली तर त्यामुळे आदिवासी युवक आपोआप या प्रशिक्षण केंद्राकडे वळल्याशिवाय राहणार नाही.

६.४ सैन्य व पोलीस दलांनी या सेवापूर्व प्रशिक्षण कार्यक्रमातील उमेदवार प्राधान्याने सेवेत घ्यावे असे वाटत असल्यास या केंद्रामधील प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये कडक शिस्त येणे आवश्यक आहे. शारिरीक कसरती, कवायती, संचलन या सर्व कार्यक्रमांमध्ये, आदिवासी युवकांच्या मनामध्ये शिस्त निर्माण होणे आवश्यक आहे. त्याकरिता केंद्र प्रमुखाने केवळ मुलांना

प्रशिक्षण देऊन चालणार नाही. तर त्याच्या व त्याच्या अन्य सहकार्यामध्येही ही सैनिकी शिस्त दृगोचर होणे आवश्यक आहे. असे झाले तरच या युवकांना निवडण्यात सैन्य व पोलीसदल पुढे येतील.

६.५ प्रशिक्षण अर्धवट सोडून जाणाऱ्या प्रशिक्षणार्थीवर नंतर कडक कारवाई करण्यात येईल, असे घोषित केल्यास, प्रशिक्षण अर्धवट टाकून जाण्याचे प्रकार कमी होतील या प्रशिक्षणार्थींची नांवे प्रकल्प अधिकारी कार्यालयातील यादीमध्ये असल्यामुळे नंतर प्रशिक्षणार्थींचा शोध घेणे जड जाणार नाही, याची कल्पना या विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे. (सैन्य दलात असे प्रशिक्षण टाकून पळून जाणाऱ्यांवर जशा कारवाया केल्या जातात त्या स्वरुपाच्या शिक्षा असाव्यात.)

६.६ या सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये अपेक्षित शिस्त व कामात एक सूत्रता येण्याकरिता शिक्षक व प्रशिक्षकांची नेमणूक करतांना त्यांच्याकडून गुणवत्तेच्या किमान अटी पूर्ण होतील, हे पाहिले जाणे आवश्यक आहे. तसेच चांगल्या दर्जाच्या शिक्षकांनी या क्षेत्राकडे वळावे, असे वाटत असल्यास त्यांना मानधनाऐवजी नियमित वेतन मिळणे आवश्यक आहे.

६.७ या प्रशिक्षण केंद्रांना वर्ग सुरु करतांना ज्या गोष्टींची व साधनसामुग्रीची आवश्यकता असते. अशा वस्तुंची तरतूद केंद्रामध्ये आगाऊ केली जाणे आवश्यक आहे. केंद्राची क्षमता लक्षात घेऊन ही तरतूद केली जावी व नंतर दरमहा त्यांची तपासणी करण्यात यावी. प्रशिक्षणार्थ्यांना मुलाखती करिता भरती केंद्रांवर नेण्याकरिता लागणारा निधी प्रकल्प अधिकारी कार्यालयात तयार असावा, म्हणजे प्रशिक्षण कालावधीतील भरतीसाठी निधी अभावी मुलांना नेता आले नाही, असे घडणार नाही.

६.८ प्रशिक्षण केंद्रामधील स्वयंपाक करणाऱ्या आचाऱ्यांना प्रकल्प अधिकारी स्तरावर आरोग्य व आहार विषयक सोप्या भाषेमध्ये प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. तसेच रोजचा आहार काय असावा, याबाबत आहारविषयक तज्ज्ञांचा सल्ला घेण्यात येऊन तसा आहार प्रमाण तक्ता करण्यात यावा. जेवण वाढण्याकरिता या विद्यार्थ्यांच्याच पाळया लावून दिल्या जाव्यात. हे काम नेमून दिल्याप्रमाणे व्हावे, याची जबाबदारी (Group leader) त्या त्या गटाच्या नेत्यांकडे द्यावी.

६.९ सैन्य व पोलीस दलातील तसेच राज्य परिवहन महामंडळातील वाहनचालक पदांकरिता जेव्हा भरती असेल तेव्हा त्या क्षेत्रातील प्रकल्प अधिकारी कार्यालयांना कळविण्याचे आणि प्रशिक्षण केंद्रातील योग्य उमेदवारांना नोकरीत अग्रक्रम देण्याचे बंधन (commitment)घातले जावे.

***

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

"सेवापूर्व प्रशिक्षण संस्थांची मूल्यमापन पाहणी "

प्रश्नावली क्र. १

चौक क्र. १ : प्रशिक्षण केंद्राची प्राथमिक माहिती

१. सेवापूर्व प्रशिक्षण केंद्राचे नांव

गांव तालुका जिल्हा

२. प्रशिक्षण केंद्र केव्हापासून सुरू करण्यात आले ? :

३. प्रशिक्षण केंद्राची उद्दिष्टे कोणती ते थोडक्यात सांगा. :

४. प्रशिक्षण केंद्र सुरू झाल्यापासून वर्षवार प्रवेशाची माहिती. :

| अ.क्र. | वर्ष व प्रशिक्षणाचे नांव | किमान शैक्षणिक पात्रता | प्रत्येक प्रशिक्षणासाठी जागांची क्षमता | प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या | प्रशिक्षणाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | १९८९-९० | | | | |
| | १. | | | | |
| | २. | | | | |
| | ३. | | | | |
| | ४. | | | | |
| २. | १९९०-९१ | | | | |
| | १. | | | | |
| | २. | | | | |
| | ३. | | | | |
| | ४. | | | | |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ३. | १९९१-९२ | | | | |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ४. | १९९२-९३ | | | | |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |

## चौक क्र. २ : प्रवेशाचे निकष

१. कोणकोणत्या प्रशिक्षणासाठी विद्यार्थी अर्ज करतात ? : १.
२.
३.
४.

२. प्रवेश देताना प्रशिक्षणार्थींसाठी: कोणते निकष लावले जातात ?

अ] शारीरिक निकष कोणते ?

ब] बौद्धिक निकषकोणते लावले जातात

क] Optitude test घेतात कां ? व स्वरूप थोडक्यात द्या:

३. प्रशिक्षणासाठी अर्ज आल्यानंतर : प्रवेश देण्याच्या प्रक्रियेला किती कालावधी लागतो ?

४. प्रवेशपत्र प्रशिक्षणार्थींना : वेळेत पाठविली जातात कां ? होय / नाही

## चौक क्र. ३ : प्रवेश देण्यापूर्वीच्या तपासण्या

१. प्रशिक्षणातील गळतीसंबंधी :
माहिती द्या.

२. प्रवेश घेतल्यानंतर प्रशिक्षण :
कार्यक्रमातून कमी झालेल्या
प्रशिक्षणार्थींची माहिती
व कारणे द्या.

३. प्रवेश देताना प्रशिक्षणार्थींची : होय / नाही
वैद्यकीय तपासणी होते कां ?

४. वैद्यकीय तपासणी कोणाकडून :
केली जाते ?

## चौक क्र. ४ :

१. या प्रशिक्षण केंद्रामध्ये सैन्यभरती :
सुरक्षा दलातील भरती/पोलीस/
इत्यादींसाठी व या व्यतिरिक्त
प्रशिक्षण दिले जाते कां ? दिले
जात असल्यास कोणत्या प्रकारचे
प्रशिक्षण दिले जाते ?

२. अ] प्रशिक्षणार्थींना शारीरिक :
व बौध्दिक प्रशिक्षण काय
देतात ?

टक्केवारी

ब] शारीरिक क्षमतेच्या चाचणी-:
मध्ये मागे पडणारे प्रशिक्षणार्थी
पुढीलपैकी कोणत्या शारीरिक
क्षमतेत मागे पडतात ? अशा
प्रशिक्षणार्थींची टक्केवारी
लिहा.

१. गुडघे घासणे
२. पायाचे तळवे सपाट असणे
३. अंगावर चट्टे असणे
४. वजन कमी असणे
५. पळण्यामध्ये मागे पडणे
६. उंची कमी असणे.

क] बौध्दिक क्षमता चाचणीमध्ये मागे पडणारे प्रशिक्षणार्थी कोणत्या विषयात मागे पडतात ? टक्केवारी द्या. :
१. इंग्रजी
२. गणित
३. सामान्य विज्ञान
४. मराठी

३. शारीरिक क्षमतेत मागे पडणा-या प्रशिक्षणार्थींची कोणत्या बाबीमध्ये जास्त तयारी करून घेतली जाते. :

४. प्रशिक्षण दिल्यानंतर चाचणी घेतात कां ? : होय / नाही

५. चाचणी घेत असल्यास त्याचे परिणाम [ ] काय आहेत ? व त्यावर कोणते उपाय योजले जातात. :

चौक क्र.५ : प्रशिक्षणासाठी शिक्षकाचे नियोजन

१. प्रशिक्षण केंद्रांसाठी नियमित शिक्षकाचे नियोजन :

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे नांव | वक्ते/ शिक्षक-संख्या | नावे व शैक्षणिक पात्रता | शिकविण्याचा विषय | शिकविण्या क्षेत्रातील अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |
| ६. | | | | | |
| ७. | | | | | |
| ८. | | | | | |

२. बाहेरून बोलविलेल्या व्याख्यात्याचे नियोजन :

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे नांव | वक्तो / शिक्षक-संख्या | नांवे व शैक्षणिक पात्रता | शिकविण्याचा विषय | अनुभव | दिले जाणारे मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |

चौक क्र. ६ :

१. अ] प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण : केंद्राकडून कोणकोणत्या वस्तू पुरविल्या जातात ? कायम स्वरूपी दिल्या जाणा-या वस्तू कोणत्या ? प्रशिक्षण संपल्यानंतर परत घेतल्या जाणा-या वस्तू कोणत्या ?

| कायम स्वरूपी दिल्या जाणा-या वस्तू | तात्पुरत्या स्वरूपात दिल्या जाणाऱ्या वस्तू |
|---|---|
| १. | |
| २. | |
| ३. | |
| ४. | |
| ५. | |
| ६. | |
| ७. | |

ब] प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण : केंद्राकडून कोणत्या सेवा पुरविल्या जातात ?

२. अ] प्रशिक्षणार्थींना भोजनामध्ये कोणकोणते पदार्थ देण्यात येतात व त्याचे प्रमाण प्रत्येकी किती असते ?

| पदार्थ | प्रत्येकी प्रमाण [ठरलेले असल्यास] |
|---|---|
| १. | |
| २. | |
| ३. | |
| ४. | |
| ५. | |
| ६. | |

ब] प्रशिक्षणार्थींची सब्येत सुदृढ :
[ ] होण्या-
साठी विशेष आहार काय
दिला जातो ?

३. एका प्रशिक्षणार्थींसाठी भोजना-:
वर अंदाजे किती खर्च केला जातो ?

४. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशि-: होय / नाही
क्षणार्थींना नोकरी लागली किंवा
नाही याचा आढावा घेण्यात
येतो कां ?

५. अ] प्रशिक्षणार्थींना मैदानी :
खेळांच्या संदर्भात कोणकोणत्या
सुविधा पुरविल्या जातात ?

ब] प्रशिक्षणासाठी खेळाचे कोणते :
साहित्य उपलब्ध आहे व काय
पुरविले जाते ?

६. प्रशिक्षण नियंत्रकांना प्रशिक्षण :
सत्रे राबविण्यात येणा-या कोणत्या
अडचणी येतात ?

७. प्रशिक्षण सत्रे आदिवासी युवकांना: होय / नाही
उपयुक्त आहेत कां ?

८. प्रशिक्षण केंद्रे अधिक उपयुक्त :
होण्याच्या दृष्टीने आपण काय
उपाययोजना सुचवाल ?

दिनांक :

सही

ठिकाण :